
त्या रात्री पाऊस होता..
-देव

# कथा -

१. त्या रात्री पाऊस होता..

२. व्हेलेंटाइन डे..

३. अहो चहा घेताय ना?

४. कुणास्तव.. कुणीतरी

५. पत्रास कारण की...

## त्या रात्री पाऊस होता..

ट्रींग ट्रींगsss…..ट्रींग ट्रींगsss….. टेलीफोन खणखणला. इतक्या वादळी रात्री त्याचं वाजणं जरा आश्चर्याचच होतं. मध्यरात्रीची वेळ, पाऊस तर धोधो कोसळत होता, त्याच्या साथीला कडाडणाऱ्या विजा, वेडावाकडा सैरावैरा पळणारा वारा रात्रीला अजुन रौद्र करत होते. तशात लाईट्स गेलेले म्हटल्यावर काळोख अजुन भयाण वाटत होता. प्रकाश असला तर त्याच्या साम्राज्यात आपण आपलं एक जग तयार करतो मात्र त्याच्या बाहेरच्या काळोखी जगापासून आपण खुप अनभिज्ञ असतो. टेलीफोनच्या आवाजाने गाढ झोपलेल्या डॉक्टरांना जाग आली. डोळे चोळत त्यांनी काळोखात फोनच्या बाजुला असलेलं घड्याळ पाहिलं. लख्खपणे चमकलेल्या एका विजेच्या प्रकाशात त्यांना घडाळ्यातील काट्यांच दर्शन झालं. तशातच त्यांनी फोन उचलला.

“हॅलो”

“हेलो, डाक्टर साहेबांशी बोलायचय.”

“बोलतोय. आपण?”

“साहेब मी सखाराम बोलतोय. ताडगांव वरुन. माझी पोरगी लय आजारी हाय.”

“काय होतय तिला?”

“तापान तव्यासारखी तापलिया, तुम्ही येऊन बघा जरा. लय मेहेरबनी व्हइल.”

“इतक्या रात्री?” डॉक्टरांनी नकारात्मक पवित्रा घेत प्रश्न केला.

समोरुन काहीच उत्तर न आल्याने स्वतःच पुढे म्हणाले, “अहो रात्रीचे दोन वाजतायत आणि पाऊस पण फार आहे. मी सकाळी येऊन जाईन.”

“साहेब आजारपण येळ आनी हंगाम बघुन कुठ येतय. लय नड हाय. तिचं हाल व्हतायत, उपकार करा. तुमच्याबद्दल लय ऐकुन हाय, निराश नका करु साहेब.”

वैद्यकी निदानासाठी तसेच माणूसकीसाठी अल्पावधीत प्रसिद्ध झालेले डॉक्टर विनवणी टाळू शकले नाहीत.

“ताडगाव ला कसं यायचं सांगा, मी ह्या गावी नवीन असल्याने मला आजुबाजुचा भाग तितकासा माहीत नाही.”

“साहेब तुमच्या गावापासून वारम गावाचा रस्ता धरा, थिरवळच्या फाट्यावर आत या, २-३ मैलांवर आजुन एक कच्चा रस्ता दिसल, तिथुन आत आलात की ८ मैलावर ताडगांव. साहेब गावात आलात की लगच गनपतीच मंदिर लागल त्याला लागुन हाय माझं घर.”

थोडे संभ्रमित असतानाही स्वतःकडे असलेल्या कारच्या आधारावर डॉक्टरांनी जाण्याचा निर्णय घेतला, पण पाऊसाची आणि अनोळख्या भागाची चिंता होतीच. ताडगावचा मार्ग जरी लक्षात आला असला तरी गरज पडल्यास रस्त्यात कोणाला ना कोणाला मार्ग विचारुन गावी पोहोचता येईल असा विचार त्यांनी केला.

“ठीक आहे, मला यायला साधारण दिड एक तास लागेल अस वाटतय, पाऊसामुळे खुप व्यत्यय नाही आला तर. ठीक आहे?”

“धन्यवाद साहेब, आज काही आडचन न्हाई येनार.”

“मी येईपर्यंत मुलीच्या डोक्यावर पाण्याच्या पट्ट्या ठेवत रहा. मी निघतो लगेच.”

“बर साहेब.”

डॉक्टरांनी पटकन जायची तयारी केली, बॅग, टॉर्च, छत्री घेतली आणि दाराला कुलुप करुन मोटार सरकारी क्वार्टर्स बाहेर काढली. थोड्याचवेळात गाडी वारम गावी जायच्या रस्त्याला लागली जो भाग डॉक्टरांना खुप ज्ञात नव्हता. रस्ता अगदी अरुंद, दोन्ही बाजुला गच्च झाडी.

पंचक्रोषित एकच सरकारी दवाखाना असल्याने रुग्णांकडून भागातील गांवांची नांवे डॉक्टरांना फक्त थोडीफार ऐकुन माहीत मात्र प्रत्यक्ष जायची ही पहिलीच वेळ होती.

पाऊसाचा जोर वाढला होता, अगदी ढगफुटी व्हावी तसा. जोराच्या वाऱ्यामुळे रस्त्यावर झाडांची पाने गळुन पडत होती, रस्त्यावर पाण्याचे झोत वाहत होते आणि त्या पाण्याला चिरत गाडी पुढे जात होती. सर्वत्र भयाण, गुढ काळोख. खेडेगावांत तसेही रस्त्यावर दिवे नसतात, आणि असते तरी खुप काही फरक पडणार नव्हता. अशा परिस्थितीत गाडी चालवायचं काम मोठ जिकरीचं होतं आणि डॉक्टर मोठ्या काळजीपूर्वक गाडी चालवित होते. रस्ता अगदी सामसुम, फक्त वीजा-पाऊसाचा कर्कष्य आवाज. समोरचा रस्ता स्पष्ट दिसतही नव्हता. खुप अवेळ असल्याने डॉक्टर आधीच अस्वस्थ होते आणि त्यात भयाण वातावरण भर घालत होतं.

आता त्यांच पहिलं ध्येय होतं ते म्हणजे थिरवळ गावाचा फाटा गाठणं, त्यानंतर जेमतेम १०-१२ मैलांचा पल्ला गाठायचा होता. पण पाऊण एक तास उलटला तरी थिरवळचा रस्ता काही लागेना, त्यांची बेचैनी वाढत चालली होती. रस्त्याला मैलाचे दगडही नसल्याने त्यांच्या अडचणीत भर पडली होती. रस्त्याला कोणीही दिसलं तरी रस्ता विचारायचा हे त्यांनी ठरवलं पण रस्त्याच्या आजुबाजुला कुठेही वस्ती दिसत नव्हती आणि अशावेळी रस्त्यावर कोणी दिसण्याचा प्रश्नच नव्हता. समोरुन किंवा मागुन येणारं कोणतं वाहन पण दिसत नव्हतं. वेळ खुप कठीण होती. मनात थोडी धाकधुक. मी सोबत कोणा माहीतगार माणसाला आणायला हवं होतं असा एक विचार मनाला चाटुन गेला.

डॉक्टरांनी अजुन थोडं अंतर कापलं. पुढे गेल्यावर रस्त्याला असलेल्या डाव्या बाजुच्या फाट्यामुळे त्यांची बेचैनी कमी झाली खरी पण खुप वेळेसाठी नाही, कारण त्याच ठिकाणी

उजवीकडे अजुन एक फाटा होता. त्यांना अशा वादळी रात्री रस्ता चुकायचा नव्हता, कोणाला तरी त्यांच्या वेळेवर पोहोचण्याची नितांत गरज होती. पण केवळ नशीब बलवत्तर म्हणून त्याठिकाणी एक व्यक्ती उभी होती. वादळी पावसात एका छत्रीचा आश्रय घेत. थोडी अचंब्यात टाकणारी असली तरी तितकाच दिलासा देणारी गोष्ट होती कारण क्वार्टर्स मधुन बाहेर पडल्यापासून त्यांना दिसलेली ही पहिली व्यक्ती होती. तरी त्यांच्या मनात घालमेल सुरु झाली, ह्या निर्जन ठिकाणी हा एकटा उभा आहे, काय करावं? ह्याला विचारावं का? आजुबाजुला पाहिलं तर रस्त्याला फलक पण नव्हते. त्यांच्याकडे दुसरा पर्याय नव्हता.

त्यांनी गाडी त्याच्याजवळ थांबवली, आणि टॉर्च चालू करुन खिडकीची काच खाली केली. टॉर्चच्या प्रकाशात जमेल तितक न्याहाळत त्यांनी त्याला प्रश्न केला.

“ह्यातला थिरवळचा फाटा कोणता?”

त्याच्याकडून गूढ शांततेशिवाय काहीच प्रतिसाद नाही मिळाला. पाऊसाच्या आवाजात त्याला नीट ऐकु आलं नसावं म्हणून डॉक्टरांनी चढ्या आवाजात परत प्रश्न केला.

“ह्यातला थिरवळ गावचा रस्ता कोणता?”

यावेळी त्याच्याकडून त्यांना प्रतिसाद मिळाला तो हाताच्या हालचालीच्या रुपात. त्याने हाताने डाव्या रस्त्याकडे बोट दाखवत उत्तर दिलं.

डॉक्टरांना थोडा धीर आला. खात्रीसाठी परत त्यांनी त्या रस्त्याकडे बोट दाखवत विचारल “हा रस्ता?”

आता त्याने उत्तरादाखल फक्त मान हलवली. अधिक माहितीसाठी त्यांनी विचारलं “ताडगांव किती लांब आहे अजुन?”

ह्यावेळी त्याने मान आणि खांदा ह्यात छत्रीचा दांडा धरुन दोन्ही हाताची दहाही बोटे दाखवत तोंडाने “अ आ..  आ आ..” असे विचित्र आवाज काढत मान २-३ वेळा हलवली. डॉक्टरांना

एकुण सगळ चमत्कारीक वाटलं पण समजायच ते समजुन त्यांनी “थँक यु” म्हटलं आणि भांबावलेल्या नजरेने त्याला बघत काच वर केली. तो मात्र निर्विकार, स्तब्ध, गंभीर व तितकाच खंबीर, निर्जन ठिकाणी मध्यरात्रीच्या वेळी धो धो कोसळणारया पावसाचा फारसा परिणाम न होणारा.

डॉक्टरांनी गाडी त्याने सांगितलेल्या रस्त्यावर वळवली. एका हाताने खिशातील रुमाल काढुन चेहरयावर पडलेल पाणी पुसत ते त्या माणसाबद्दल विचार करु लागले. तो माणूस जवळ जवळ पूर्ण भिजलेला, अंगात मळकट अंगरखा, लेंगा, दाढीचे खुंट वाढलेले, बारिक पांढरे केस, केविलवाणे डोळे, चेहरयावर ओसंडून वाहणारी गरिबी. हा यावेळी एकटा इथे काय करत असेल? आजुबाजुला घर असावं असं वाटत तर नाही, बस थांबा पण दिसला नाही. डॉक्टरांना त्याचं गुढ वाटलं, तसच थोड वाईटही. आधीच इतकी खडतर परिस्थिती आणि त्यात तो मुका असावा. ह्या क्षेत्रात आणि ग्रामिण भागात त्यांनी ह्यापेक्षा बेजार लोकं पाहिली होती, पण याला पाहून त्यांना काहितरी विलक्षण वाटलं हे खरं.
त्यांच्या मनात विचार चालू झाले. “अस काय झालं असाव की त्याला ह्यावेळी कोसळत्या पावसात इथे उभं रहायला लागलं. त्याला मदतीसाठी विचारलं पाहिजे होतं का? पण तो विचित्र पण वाटत होता आणि त्या मुलीकडे पण पोहोचायचय वेळेत. असो.” असा विचार करुन त्यांनी गाडी रस्त्यात लागलेल्या पहिल्या कच्च्या रस्त्याला वळवली.

आतला भाग खुपच दुर्गम वाटत होता. रस्ताही दगड मातीचा असल्याने सावकाश जाण्याशिवाय पर्याय नव्हता. पण आता ७-८ मैलांनंतर ताडगाव येणार आणि त्या मुलीचे उपचार होणार म्हणून त्यांना समाधानही वाटत होतं. त्यांची बेचैनी पण थोडी कमी झाली. पावसाचा जोर थोडा मंदावला. साधारण ७-८ मैल झाल्यावर सखारामने सांगितल्यानुसार

त्यांना रस्त्यात मंदिर लागलं. खुप उशीर झाला नव्हता, नियोजित वेळेनुसार डॉक्टर पोहोचले होते. त्यांनी गाडी मंदिराच्या समोर थांबवली. बॅग, छत्री घेतली व टॉर्च चालू करुन गाडीतून उतरले आणि बाजुच्या घराच्या दिशेने पायवाटेचा मार्ग काढू लागले.  गाडीचा आवाज ऐकल्याने, एव्हाना घराचा दरवाजा उघडून कोणीतरी कंदिल हातात घेउन उभं असलेलं त्यांना दिसलं. चालता चालता सहज त्यांनी मंदिरात डोकावलं, समईच्या प्रकाशात शेंदूर फासलेली मारूतीची मूर्ती तेजस्वी दिसत होती. उजवा हात छातीला लावून नमस्कार करत, "जय बजरंगबली!" पुटपुटत ते घरासमोर पोहोचले आणि थबकले.

'सखारामने तर गणपतीचं मंदिर सांगितल होतं ना, पत्ता ऐँकण्यात माझी काही चुक झाली का? असेल कदाचित, इतर कोणतं मंदिर तर दिसलं नाही रस्तात.' तोच हातात कंदील घेतलेली ती व्यक्ती पुढे आली. तो एक १४-१५ वर्षांचा मुलगा होता. त्याला पुढे आलेलं पाहुन डॉक्टरांनी प्रश्न केला, "पेशंट कुठे आहे?" मुलगा म्हणाला, "आत." डॉक्टरांच्या हातातली बॅग घेऊन त्याने दरवाजा पूर्ण उघडला, "या."

डॉक्टर आत आले. कंदिलाच्या मिणमिणत्या प्रकाशातही दारिद्र्य उठून दिसत होतं. एका खाटेवर ८-१० वर्षाची मुलगी अंगावर घोंगडी ओढुन झोपली होती. तिच्या उशाशी एक बाई बसलेली, तिची आई असावी. घरात इतर कोणीच नव्हतं, सखाराम पण नव्हता. मुलगा बाईला म्हणाला "मामी, डाक्टर आलेत बघ." बाई जागेवरुन उठुन उभी राहीली. कमी उजेड आणि चेहऱ्यावरचा पदर यामुळे तिचा चेहरा स्पष्ट दिसत नव्हता तरी मुलीच्या आजारपणाच्या तणावाखाली असल्यासारखी, उदास. डॉक्टर मुलीच्या बाजुला खाटेवर बसले, मुलाने बॅग त्यांच्या बाजुला ठेवली.

"कधीपासुन आहे ताप?" डॉक्टरांनी नाडी बघण्यासाठी मुलीचा हात हातात घेत विचारलं

“द..दोन हफ्त झालं.” बाई खालच्या आवाजात आणि अडखळत म्हणाली.

“इतके दिवस अंगावर का काढले? आधीच का नाही आणलं दवाखान्यात?” डॉक्टरांनी तिचे डोळे तपासत विचारलं.

बाई गप्प.

डॉक्टरांनी मुलीच्या छातीला स्तेथोस्कोप लावून पाहिलं, थर्मोमीटरने तिचा ताप पाहिला.

ती अगदी मलुल, चेहरा उतरलेला. “जीभ काढ बाहेर.”

तिने मोठ्या त्रासाने तोंड उघडलं. तपासुन झाल्यावर डॉक्टरांना टायफाईडची लक्षणे जाणवली.

“डोकं दुखतय का?” डॉक्टरांनी तिला विचारलं. मुलीने होकारार्थी मान हलवली.

“अंग?” उत्तरादाखल तिने परत मान हलवली.

“मळमळ वाटतेय? अजुन काही वाटतय का?” ती गप्प.

“बर, काय काय खाल्ल दिवसभरात?”

ती गप्प, “जरा भात खाल्ला.” आईने उत्तर दिलं.

“बरं मला वाटतं टायफाईड असावा, घाबरुन जायची गरज नाही, उद्या तिला दवाखान्यात आणा, मग उपचाराला सुरुवात करु. आराम मिळावा म्हणून एक इंजेकशन देतो आता.”

मुलीचा चेहरा इंजेकशनचं नाव ऐकुन रडवेला झाला, तिच लक्ष दुसरीकडे वळवायला डॉक्टरांनी विचारलं,

“शाळेत जातेस का तू?” तिच्याकडून काहीच उत्तर नाही.

“नांव काय तुझं?” परत एक प्रश्न केला.

ती शांतच. “शेवंती” त्या मुलाने उत्तर दिलं.

“बर उद्या यायचं हा दवाखन्यात, आणि लगेच बरं व्हायचं. येणार ना?” डॉक्टरांनी स्मित हास्य करत तिला विचारलं.

ती शांतच.

“तिला बोलता येत नाही.” तिचा भाऊ मागुन बोलला.

डॉक्टरांनी स्वाभाविक प्रतिक्रीया दिली “ओह..”

“बरं, मी काही गोळ्या देतो, आता तिला द्या एक, शांत झोपुदे तिला, सकाळी १० वाजता आणा तिला सरकारी दवाखान्यात. मग अजुन तपासणी करु. काळजी करु नका. ठीक आहे?” डॉक्टरांनी विश्वास देत म्हटलं. इतक्या अडचणी पार करुन हेतू साध्य करण्याचा तणाव त्यांच्या चेहर्‍यावरुन निघुन गेलेला.

“बरं.” मुलगा म्हणाला.

“पण हिला कशामुळे बोलता येत नाही?” बॅग भरताना डॉक्टरांनी कुतुहलाने तिच्या आईला विचारलं.

“जन्मापासूनच, तिच्या बा कडून तिला आलय हे.” तिच्या आईने खालच्या आवाजात उत्तर दिलं.

“बरं, मी निघतो आता.” गडबडीत बॅग बंद करत डॉक्टर म्हणाले आणि उभे राहीले.

अचानक त्यांना काहितरी जाणवलं, चेहर्‍यावर आठ्या पडल्या. “काय?” हैराण होत त्यांनी विचारलं.

अधिक खोलात न शिरता त्यांनी पुढील प्रश्न केला “हिचे वडील कुठे गेले.”

बाई आणि मुलगा शांत. डॉक्टरांनी पुन्हा त्याच प्रश्नाच्या अनुशंगाने “आं?” केल.

बाई स्तब्ध, मुलगा उत्तरला “ते ....” त्याला मध्येच तोडत डॉक्टर म्हणाले “त्यांनी मला फोन.....” इतकच बोलुन काहितरी विचार करु लागले.

“काय?” बाईने आश्चर्याने आणि मोठ्याने विचारलं.

डॉक्टर चपापले. ते अजुन काही स्पष्टीकरण देणार तोच...... तोच...... लाईट्स आले, लख्खपणे घरातील एक बल्ब पेटला, काळोखाचं साम्राज्य संपल आणि डॉक्टर सुन्न झाले, स्तब्ध झाले, हैराण झाले.

समोरच्या भिंतीवर एक तसबीर लटकवली होती, फुलांचा हार घातलेली तसबीर, त्या तसबीरीत त्याचा फोटो होता. जे डोळ्यासमोर होतं त्यावर डॉक्टरांचा विश्वास बसेना. ‘ह्याचा फोटो? तिच दाढी, तेच केस, तेच डोळे, तोच चेहरा, हा तोच... ज्याने मला रस्ता दाखवला. पण कसं शक्य आहे?’ त्यानीं त्रासिक नजरेने बाईकडे पाहीलं, आणि तिच ते पांढर कपाळ पाहून ते खाटेचा आधार घेत खालीच बसले. मुलाने त्यांना आधार दिला.

“काय झालं?” त्याने डॉक्टरांना विचारलं.

“हा.. हा कोणाचा फोटो आहे?” डॉक्टरांनी श्वास रोखत विचारलं.

“माझ्या मामांचा. दोन हस्त्यांमाग गेला तो.” मुलगा म्हणाला.

“कसं शक्य आहे? ह्यानेच तर मला थिरवळ फाट्यावरुन इथे ताडगावला यायच रस्ता दाखवला. ह्याचं… ह्याचं नांव सखाराम ना?” डॉक्टर पुटपुटले.

“नाही, माझा मामा लखोबा आणि हे ताडगांव नाही, अंबापूर आहे. ताडगांव वारमच्या तिकडच्या अंगाला राहीलं.” मुलगा हात हलवत बोलला.

आणि थिरवळ फाट्यापासूनचा सगळा प्रवास क्षणार्धांत डॉक्टरांच्या डोळ्यासमोरुन सरकला. जे काही समोर आलं त्यावर त्यांचा विश्वास बसेना.

म्हणजे पत्ता ऐकण्यात माझ्याकडून चुक नव्हती तर...

ह्या मुलीच्या तापाला दोन आठवडे झाले आणि लखोबाला जाऊन पण...

अनुवंशिकतेने तिला आलेलं मुकेपण...

त्याने मला ह्या गावी, ह्या घरी आणलं... हो त्यानेच जो जिवंत नाही आहे...

आणि वादळी मध्यरात्री त्या निर्जन ठिकाणी तो काय करत होता.. ह्याच उत्तर त्यांना मिळालं..

ते थोडावेळ निर्विकार, निष्क्रीय बसुन राहीले. जे काही अनुभवलं ते पचनी पडायला वेळ लागत होता. शेवटी आपलं प्रकाशाचं विश्व खुप लहान आहे, बाहेरील विशाल काळोखी विश्व आपल्या आकलनशक्तीच्या खुप बाहेर आहे हे जाणलं, मानलं आणि ते घराबाहेर पडले. पाऊस पूर्ण थांबला होता, आकाश पण स्वच्छ होत होतं. त्यांनी गाडी सुरु केली. उजाडायला सुरुवात झालेली. थोड्यावेळात ते थिरवळचा फाट्यांवर पोहोचले जिथे लखोबा भेटला होता. आता तिथे कोणीच नव्हतं. ते क्षणभर थांबले, आणि त्यांनी गाडी उजव्या रस्त्याला ताडगांवच्या दिशेला वळवली.

***

## व्हेलेंटाइन डे..

टॅक्सीला हात दाखवून हातातील फुलांचा गुच्छ सांभाळत तो टॅक्सीत बसला. टॅक्सी त्याच्या इच्छित स्थळी पूढे चालू लागली, तसा तो आठवणींच्या प्रवाहात मागे वाहू लागला.

त्या दिवसांत तो पदव्युत्तर शिक्षण घेत होता. दिवसभर नोकरी करुन संध्याकाळी अभ्यासाला लायब्ररीत यायचं हा त्याचा नित्यक्रम. नेहमी पुस्तकांत रमणारा तो, अलीकडे मात्र तिच्या विचारांत अधिक रमत होता. ती सुध्दा अभ्यासाला लायब्ररीत यायची, मैत्रिणींसोबत सकाळच्या सत्रात न येता संध्याकाळी यायची. पुस्तकांच्या देवाण-घेवाणीमुळे झालेली त्यांची ओळख, मैत्रीच्या रुपात हळू हळू खुलत होती. लायब्ररीमध्ये यायची वेळ जरी ठरवलेली नसली तरी आल्यावर समोरासमोरच बसणं हे मात्र ठरलेलं.

अशाच एका संध्याकाळी ती आली. पण थोडी उदास होती.

"काय ग, झाली का ख्रिसमसची खरेदी?" त्याने तिला बोलतं करायला विचारलं.

"हो." तिचा स्वरही जरा नाराजीचा वाटत होता.

"काय काय घेतलंस?"

"नथिंग."

"काय झालं? चेहरा का पाडून आहेस असा?"

काही क्षण थांबुन ती म्हणाली "आम्ही आज रात्री गोव्याला जातोय. परवा ख्रिसमस आहे ना."

तिची उदासी घालवायला निघालेला तो आता मात्र स्वतःच उदास झाला होता, पण त्यातही आपल्यापासून दूर जाणं हे तिच्या उदासीच कारण आहे हे ध्यानात येताच क्षणभर सुखावलाही.

“अगं मग उदास होण्यासारखं काय आहे त्यात?”

“अरे.. दॅट मिन्स आता 4-5 डेज आपण…” अस म्हणून तिने शब्द आवरते घेतले. “तुला काहीच वाटत नाहिये ना?” ती पुढे म्हणाली.

“मला? मला काय वाटयच त्यात, किती आनंदाची गोष्ट आहे. तुम्ही मस्त एंजॉय करणार ना.” तिच्या मनात नक्की काय चाललंय हे चाचपडून पहायची संधी त्याने दवडली नव्हती. चेहर्‍यावर खोट्या हास्याची एक रेघ उमटवत तिने पुस्तकात डोकं खुपसलं. काही वेळातच पुस्तकं एकवटत ती म्हणाली “आय एम लिव्हींग नाऊ.”

“इतक्या लवकर?”

“हो जाते, उशीर होईल.” तिची नजर आज उठत नव्हती. कदाचित डोळ्यातलं पाणी लपवत असावी.

उदास तर तोही फार झालेला. तरिही ती जाण्याआधी एकादा तिचा गोड हसरा चेहरा पहावा म्हणून जरा आनंदाचं अवसान आणत तो म्हणाला “मेरी ख्रिसमस! एंजॉय!”

ती हसली खरी, पण अश्रु मात्र डोळ्यांची कडा ओलांडू पहात होता. पण पापण्यांच्या हालचालीत तिने लकबिने तो परतावलाही.

“बरं मग, भेटु नंतर. बाय.” ती म्हणाली.

“बाय. मी तुझी वाट..” अस म्हणत तोही थबकला. त्याचे डोळेच अधिक बोलत होते.

ती निघली. त्याचं उदास मन अभ्यासात तर नक्कीच लागणार नव्हतं. जरा वेळाने तोही निघून गेला.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी लायब्ररीत येण्याचं त्याचं मन नक्कीच नव्हतं पण कारण तर होतं. अभ्यासात स्वतःला गुंतवून घेऊन ४-५ दिवस काढावेत असं ठरवून तो लायब्ररीत आला. आज मात्र कुणाची वाट पहायची नव्हती आणि समोरची खुर्चीही रिकामीच असणार होती. त्याचे डोळे पुस्तकांमधल्या अक्षरावरून फिरत तर होते, पण मन मात्र तिची सुरेख छबी रेखाटत होतं. तिचं ते खळखळून हसणं, गालातल्या गालांत गोड लाजणं, तो वाचनात गुंग असताना त्याच्याकडे एकटक पहात रहाणं, आणि त्याचं लक्ष जाताच लगबगिने नजर पुस्तकांत वळवणं. कधीतरी मनातल्या भावना चुकून ओठांवर आल्याच तर बोट दातांमध्ये दाबत तिथुन गडबडीने निघुन जाणं. या त्यांच्यामधल्या सगळ्या मखमली आठवणी ती समोर नसताना त्याच्या मनात दाटिवाटी करत होत्या. अशाच सगळ्या आठवणींची उजळणी करत असताना त्याची नजर सहज वर गेली आणि पहातो तर काय.. ती समोर बसली होती. त्याला स्वतःच्याच डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता.

“अगं तू गोव्याला जाणार होतीस ना?” त्याने आश्चर्याने विचारलं.

“नाही गेले.”

“का?”

“नाही जावसं वाटलं.”

“अग पण..”

त्या क्षणी काही समजलं नसलं तरी ती कदाचित आपल्यासाठीच गेली नसावी हे त्याच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. तिच्या अशा अनपेक्षित येण्याने त्याच्या मनात आनंदाच्या लहरी उमटत होत्या. उठून नाचावं इतका उत्साह संचारला होता त्याच्या शरीरात, पण त्याने मनाला आवर घातला. पुस्तकावर त्याची नजर टिकत नव्हती सारखी फिरून तिच्या चेहऱ्यावर जाई. ती मात्र शांतपणे वाचत बसली होती.

दिवस असेच उलटत होते. पण अलीकडे तिचं लायब्ररीमध्ये नित्याच येणं कमी झालं होतं आणि आली तरीही शांत असायची, कमी बोलायची, तिच्या नजरेतून सतत तिच्या मनावर कसलं तरी दडपण असल्यासारखं जाणवायचं. फार गंभीर वाटायची. तिचं हे असं वागणं त्याला खटकत होतं. त्याने अनेकदा तिचं शांत रहाण्यामागचं कारण विचारण्याचा, तिच्या मनातलं जाणून घेण्याचा प्रयत्नही केला होता पण ती प्रत्येक वेळी “काही नाही.” सांगुन टाळायची. बरेचदा तो बोलत असताना त्याच्याकडे फक्त बघत बसायची.

हा हा म्हणता एक दिड महिना उलटला.

‘तिला अपेक्षित असेल माझाकडून तिच्यावरच्या प्रेमाची कबूली?...... हो, असेल कदाचित.’

‘मला जे तिच्याबद्दल वाटतं, तेच तिला माझ्याबद्दल वाटतं असेल?...... हो, मला आहे खात्री.’

‘पण धर्माचं काय? मला काही फरक नाही पडत, पण तिला?...... नाही पडणार.’

एका मनाने प्रश्न विचारले.... आणि दुसऱ्याने सोईस्कर उत्तरंही दिली. त्याची चलबिचल थोडी कमी झाली, त्याने ठरवलं की ‘व्हेलेंटाइन डे’ला आपल्या मनात ज्या काही भावना आहेत तिच्याबद्दल, त्या तिला सांगायच्या.

तो दिवस येऊन ठेपला. आज ते पहिल्यांदाच लायब्ररीबाहेर एका नवीन रम्य ठिकाणी भेटणार होते. तो फार आतुरतेने तिची वाट पहात येरझाऱ्या घालत होता. एवढ्यात ती समोर आली.

“खुप सुंदर दिसतेयस तू आज.” ती शरमली आणि तिने मान पायाच्या अंगठ्यावर वळवली. हातातलं ते लाल गुलाबाचं फुल पुढे करत तो म्हणाला. “माझं खुप प्रेम आहे तुझ्यावर.”

तिने चमकून वर पहिलं. हळुवार हात पुढे करत ते गुलाब तिने हातात घेतलं. याच क्षणासाठी आसुसलेल्या त्या नजरेने ती एकटक त्याच्याकडे फक्त पहात होती. तिच्या डोळ्यांत पाणी दाटून आलं होतं. त्याचीही नजर तिच्या चेहऱ्यावरून हटत नव्हती.

“बोल ना काहीतरी.” तो तिचा हात हातात घेत म्हणाला.

ती लगेच भानावर आली, “मीही खूप प्रेम करते तुझ्यावर.”

त्याच्या आयुष्यातील सर्वात रोमांचित क्षण तो अनुभवत होता. श्वासांना सांभाळत तो पूढे म्हणाला “कधी पासून?”

“पहिल्या भेटीपासून.” ती म्हणाली.

त्याला आकाश ठेंगणे झालं होतं. त्याने रंगलवलेली स्वप्नं पूर्ण होण्याच्या उंबरठ्यावर होती. ती स्मितहास्य करत डोळे भरून त्याच्याकडे पहात होती.

“आपण लग्न पुढल्या वर्षी करु.” स्वप्नपूर्तीच्या दिशेने त्याने पहिलं पाऊल टाकलं “तोपर्यंत माझी डिग्री पण पूर्ण होईल आणि तुझी पण. चालेल ना तुला?”

ती नुसती त्याच्याकडे बघत होती, तिला त्याच्या चेहर्‍यावरचा आनंदाचा एकही क्षण हरवायचा नव्हता. पण दुसर्‍याच क्षणी कशाची तरी आठवण झाल्यासारखा तिच्या चेहर्‍यावर अचानक गांभिर्य आलं “पण.. पण..” ती खालच्या आवाजात म्हणाली.

“पण काय?”

“मी लग्न नाही करू शकणार तुझ्याशी.”

“काय?” तिच्या या अनपेक्षीत नकाराने तो गोंधळून म्हणाला. जी स्वप्न काही क्षणांमागे पाहिली होती त्यांच अस्तित्व धोक्यात होतं.

“म्हणजे? पण प्रेम करतेस ना तू माझ्यावर?”

“हो. खुप, इतकं की कदाचितच कुणीतरी करू शकलं असेल.”

“जर, इतकं प्रेम करतेस माझ्यावर तर मग.. मग.. लग्न का नाही करू शकत माझ्याशी?” त्याने आवंढा गिळला आणि जरा गंभीर आवजात म्हणाला “मी गरीब आहे म्हणून, की आपले धर्म वेगळे आहेत म्हणून?” त्याचेही डोळे ओलावले होते.

“अस काय कारण आहे तुझ्या नकाराचं?”

तिच्या नजरेतून प्रेम ओसांडत होतं, तरी पाणावलेल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पहात ती स्तब्ध ऊभी होती.

“अग बोल ना काहितरी, की अजून काही वेगळं कारण आहे?” आता मात्र त्याच्या आवाजाचा रोख चढत होता. तिच्या या अशा गप्प रहाण्याने त्याला अधीक चीड येत होती. तरीही स्वतःला सावरत तो परत एकदा प्रश्न करणार, तेव्हढ्यात ती म्हणाली “जाते मी.”

“जाते? मला हे असं कोड्यात टाकून?”

“मला माझ्या प्रश्नाचं उत्तर हवय जेनी.”

“मी फक्त आणि फक्त तुझ्यावरच प्रेम केलंय, अँड विल ऑल्वेज लव्ह यु.” त्याचा चेहरा आपल्या हातांमध्ये भरून घेत ती म्हणाली. तिच्या नजरेतले हे असे भाव या आधी त्याने कधीच पाहिले नव्हते.

“पण मी नाही देऊ शकत तुझ्या प्रश्नाचं उत्तर. आणि आता मला जायला हवं खुप उशीर झालाय. मी जाते.” म्हणत ती वळली, त्याने तिचा हात पकडून तिला थांबवायचा प्रयत्न केला, पण त्याची पकड सोडवत पाणावलेल्या डोळयांनी तिची पावलं मागे मागे पडत होती. तिच्या या अशा वागण्याने त्याच्या मस्तकाचा पारा चढत होता.

“काय अर्थ घ्यावा मी तुझ्या या अशा वागण्याचा? माझ्या प्रेमाचा असा अपमानच करायच होता तर आलिसंच का माझ्या आयुष्यात? का दाखवलीस मला इतकी स्वप्न? जी तुला कधी पुर्ण करायचीच नव्हती. जा तू इथुन. निघुन जा.” असं म्हणत त्याने तिच्याकडे पाठ वळवली. घडला प्रकार त्याला सहन होत नव्हता. त्याच्या चेहऱ्यावर अश्रुंची धार लागली होती

तरी स्वतःच्या रागावर आवर घालत तिला परत एकदा समजवण्यासाठी म्हणून तो वळला, पण तिथे कुणीच नव्हतं. ती गेली होती. तो तसाच काही क्षण स्तब्ध उभा होता. तिच्या प्रेमाचा होकार मिळाला म्हणून आनंदून जावं की तिच्या लग्नाच्या नकाराने दुःखी व्हाव हे

त्याचं त्यालाच समजेनासं झालं होतं. तो तसाच निराश, निर्विकार, शुन्यात नजर लावून एका दगडवर बसून राहीला. हळू हळू अंधार वाढू लागला, शेवटी जड पावलांनी तो घरी परतला.

रात्रभर त्याचा डोळ्याला डोळा लागला नाही. गेली संध्याकाळ त्याच्या डोक्यात थैमान घालत होती. मनात विचारांच काहूल माजलं होतं. 'का केलं असावं तिने अस? मग इतक्या महिन्यांमध्ये जे आमच्यामध्ये घडत होतं ते काय होतं? मी तिला ओळखायला चुकलो का?.... नाही.. ती अशी नाही. पण मग तिचा हा असा लग्नाला नकार, काय कारण असेल? तिला कुणीतरी दुसरं.... नाही...नाही...' त्याला मनातही या गोष्टिंचा विचार करवेना. पण तिच्या आजच्या वागण्याचं गुढ त्याला उलघडत नव्हतं. एका क्षणासाठीही या विचारांतून तो आपली सुटका करून घेत नव्हता. ती परत कधी एकदा समोर येते असं त्याला झाल होतं. परंतु दुसऱ्या दिवशी तिच्या येण्याची वाट बघेपर्यंत त्याच्याजवळ पर्यायही नव्हता.

दुसऱ्या दिवशी तो वेळेत लायब्ररीत आला, मात्र वेळ उलटून गेली तरिही ती आली नव्हती. त्याच्या जीवाची घालमेल वाढत होती. तिच्या वाटेवरून त्याची नजर क्षणासाठीही हटत नव्हती. पण ती नाही आली. पुढील ४-५ दिवस असच चालू होतं. 'ती का येत नाहीये? का अस वागतेय ती माझ्याशी?' त्याच्या मनात प्रश्नांची गर्दी वाढत होती. सततच्या विचाराने तो फार हैराण झाला होता. पण त्याचा निर्णय पक्का होता, काहिही झालं तरी तिच्या नकाराचं कारण त्याला जाणून घ्यायचं होतं आणि कसही करून लग्नासाठी तिचा होकार मिळवायचाच हे मनाशी त्याने पक्कं ठरवलं होतं.

मागचा पुढचा काहीच विचार न करता त्याने सरळ तिच्या घरचा रस्ता धरला. पण आता त्याच्या समोर एक नवीन प्रश्न होता तो, अचानक त्याला समोर पाहून ती कसं वागेल याचा.

‘जर तिला माझं असं घरी अचानक येण आवडलं नाही तर, आणि तिच्या घरचे? पण माझ्याजवळ दुसरा पर्यायही नाहिये.’

जस जसं तिचं घर जवळ येत होतं त्याच्या मनावरचं दडपण वाढत होतं आणि तिला बघायची आसही. एव्हाना तो तिच्या घरी येऊन पोहोचला. बेल वाजवणार तेव्हड्यात त्याचं लक्ष दारावरच्या कुलूपाकडे गेलं. काही क्षण विचार केल्यावर त्याला शेजाऱ्यांना विचारून पाहणं सोईस्कर वाटलं. त्याने शेजारच्या दरवाजा खटखटवला. एका वयस्कर स्त्रीने दरवाजा उघडत प्रश्न केला. “कोण पाहिजे?”

“आंटी हे कुठे बाहेर गेलेत का?” त्याने जेनीच्या घराकडे बोट दाखवत विचारलं.

“तू कोण?”

“मी जेनीचा फ्रेंड, ४-५ दिवसांपूर्वी ती भेटली होती, त्यानंतर लायब्ररीत आली नाही म्हणून आलो तर घर बंद.”

“काय किती दिवसांपूर्वी?”

“साधारण ४-५ दिवसांपूर्वी.”

“तू कोणत्या जेनीबद्दल बोलतोयस नक्की? पत्ता बरोबर आहे ना?” त्या स्त्रीने खात्री करायला विचारलं.

“हो आंटी तिनेच पुर्वी सांगितला होता मला.” त्याने विश्वासाने सांगितलं.

“तू काहितरी चुकतोयस. हे घर जेनीच आहे पण तुझी फ्रेंड जेनी वेगळी असावी.”

“नाही आंटी हाच पत्ता आहे. ती एम. ए. करतेय ना आणि रोज लायब्ररीत यायची अभ्यासाला.”

“हो पण.. हे कस शक्य आहे?” ती स्त्री जरा विवंचनेत पडली.

“का? काय झालं? असं का म्हणताय?”

“हे घर गेले दिड महिना बंद आहे. जेनी आणि तिचं कुटुंब ख्रिसमससाठी गोव्याला जात असताना त्यांच्या गाडीला अपघात झाला, फार भिषण अपघात होता. सगळे जागीच ठार झाले. मग कशी भेटेल ती तुला?”

“काऽऽऽय?” असं मोठ्याने ओरडत त्याने हाताच्या मुठी आवळल्या त्याचा श्वास त्याच्या कंठात अडकला, त्याच्या पायाखालची जमीन सरकली होती. त्या बाईचे शब्द त्याच्यावर आभाळ होऊन कोसळले होते. त्याच्या हातांनी बाजूला असलेल्या खांबाचा आधार घ्यायचा प्रयत्न केला पण त्याची पकड निसटून तो खाली कोसळला. त्याला सावरायला ती स्त्री पुढे आली पण तो आधार नाकारत कसातरी उठून उभा राहीला आणि जड पाऊलांनी तिच्या घराजवळ आला. फाटका आडून ते बंदिस्त घर पहाताना त्याच्या पापण्या लवत नव्हत्या. मन सुन्न झालं होतं शरीर गोठून जावं तसा तो एका जागी खिळून उभा होता. त्या स्त्रीचे आघाती शब्द त्याचं मन स्विकारू पाहत नव्हतं, पण ते सतत परावर्तीत होऊन त्याच्या कानावर आदळत होते. एकाएकी वास्तवाची जणीव व्हावी तसा एका जोराच्या हुंदक्यासरशी त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले “जेनीऽऽ….” आणि तो ओक्साबोक्षी रडू लागला.

“साहेब ह्या समोरच्या रस्त्याने घेऊ ना गाडी?” टॅक्सी ड्राइव्हरच्या प्रश्नाने तो एकदम भानावर आला, डोळे पुसत त्याने होकारार्थी मान हलवली. ‘माझ्या प्रेमाची कबुलीच तिला माझ्यापासून दूर घेऊन गेली, जर त्या दिवशी मी तिला माझ्या प्रेमाबद्दल सांगितलं नसतं तर… पण तेच ऐकायला तर तिचा जीव अडकून राहीला होता.’ नेहमीप्रमाणे त्याच्या मनाचे तेच खेळ सुरु झाले.

आज व्हेलेंटाइन डे, त्याच्यासाठीचा तिच्या वास्तव्याचा अखेरचा दिवस. १७ वर्षे उलटली, तरी तिच्या आठवणी त्याच्यासाठी जराही पुसट झालेल्या नव्हत्या. लग्नाच्या बंधनात तो तिला बांधु नाही शकला, पण तिच्या प्रेमाच्या बंधनातून त्याने आजही स्वतःला वेगळं केलं नव्हतं. तिच्या त्या सगळ्या आठवणी त्याला कधी हसवतात तर कधी आसवं देऊन जातात, पण रागाच्याभरात त्याच्याकडून उच्चारून गेलेले त्याचे शब्द ‘जा तू इथुन. निघुन जा.’ त्याला आजही मरणयातना देतात.

“बस, थांबव इथे.” पाकिटातील पैसे काढत तो म्हणाला.

“साहेब, रीटर्न साठी थांबू का?”

“नको, मला वेळ लागतो, भरपूर बोलयचं असत तिच्याशी.” म्हणत तो टॅक्सीबाहेर उतरून तिच्या ग्रेव्हच्या दिशेने चालू लागला.

***

# अहो चहा घेताय ना?

“अहो चहा घेताय ना? निवतोय तो, किती वेळ लावायचा आंघोळीला.”

दाराखालून आत सरकवलेला पेपर उचलत सुजाताने विनायकला सकाळपासून दुसऱ्यांदा चहाची आठवण करुन दिली.

कॉलेज मधुन स्वेच्छानिवृत्ती घेतल्यापासून सुजाताला निदान पेपर तरी चाळायला वेळ मिळू लागला होता. होय स्वेच्छानिवृत्ती. कारणंच तशी होती त्याची. सुजाताची तब्येत ठिक नसायची. दम्याचा विकार गेल्या एक-दोन वर्षांत पार विकोपाला गेला होता. त्यामुळे मागील वर्षी, रिटायरमेंट एज च्या सात वर्ष आधीच कामाला पूर्णविराम देऊन, सुजाताने पूर्ण वेळ आराम करायचा असं ठरवलं होतं विनायकने.

विनायक बँकेत मॅनेजर होता. मात्र मागील वर्षी त्यानेही नोकरी सोडली होती. कारण होतं दोघांच्या आजारपणाचं. त्याचीही तब्येत दिवसेंदिवस ढासळत होती. कमी झालेलं वजन, खोल गेलेले डोळे, दडपणाखाली असल्यासारखा, तरीही सुजातासमोर आनंदी असल्यासारखा वावरायचा. मात्र.. तो आतून खुप खचला होता. दिवस-रात्र एकच चिंता त्याला खात होती - आपल्यामागे सुजाताचं कसं होणार?

“अहो घेताय ना चहा? सकाळपासून दोनदा केला, पण अजून एकदाही घेतला नाहीत.” सुजाताने पेपरचं पान उलटलं.

एव्हाना विनायक बाथरूम मधून बेडरूममध्ये गेला होता.

आता मात्र हद्द झाली ह्यांची असं म्हणत सुजाता पेपर तसाच टेबलवर ठेवून उठली. बेडरूमपाशी येऊन दारावर टकटक करू लागली.

“अरे का मला बापडीला त्रास देतोयस तू? नाही सोसत रे मला आता दगदग. ऐक ना.”

इतरवेळी ‘अहो-जाहो’ करणाऱ्या सुजाताचा स्वर क्वचित प्रसंगी ‘अरे-तुरे’ वर यायचा. विनायकलाही ते आवडायचं. त्यामुळे प्रेम, हक्क वाढल्यासारखा वाटतो असं त्याचं म्हणणं. बाकी प्रेमाशिवाय त्यांच्या संसारात दुसरं कुणीच नव्हतं. ना मुल, ना बाळ. त्यामुळे दोघंच एकमेकांचं सर्वस्व होती. दोघही अगदी रसिक. संगीत, नाटक, सिनेमासाठी हटकून वेळ काढायची. विविध विषयांवर चर्चा पण रंगतदार असायची.

मागील काही महिने मात्र घर उदासतेने भरलेलं. पूर्वीचा रसरशीतपणा आता पार सुकलेला. पूर्वीची रसिकता पार नायनापाट झालेली.

“हो. कपडे करायला वेळ तरी दे. दार उघडच आहे.”

सुजाता आत आली. विनायक आवरत होता.

“किती वेळ रे.”

“तू घेतलास का?”

“तुझ्याशिवाय? एकटीने? कधी घेतलाय का?”

“हं. आता सवय क…” उर्वरीत वाक्य त्याने गिळून टाकलं.

“काय?” कपाळावर आठ्या आणत सुजाताने विचारलं.

“काही नाही. चल मी आलो.” केसांवर कंगवा फिरवत विनायकने प्रश्न टाळला.

सुजाता बाहेर येऊन आरामखुर्चीवर बसली. तिला अस्वस्थ वाटू लागलं, कदाचित विनायकच्या बोलण्याने असावं.

ती तशीच डोकं मागे टेकवून निपचित पडून राहिली. समोर त्यांच्या लग्नानंतर काढेलेल्या ब्लॅक अँड व्हाईट फोटोची फ्रेम होती. तिच्या चेहऱ्यावर एकदम स्मित आलं, डोळे मिटून ती मागील पाने चाळायला लागली.

'फर्ग्युसन कॉलेज बाहेरील ते चहाचं दुकान. तिथे नेहमी येणारा विनायक आणि समोरच आमचा वाडा. काय दिवस होते ना सुंदर! पंचवीस-तीस वर्षं होत आली पण आजही आठवणी एकदम टवटवीत आहेत! कितींदातरी विनायक तिथेच दिसायचा. तेव्हापासून हे चहाचं वेड.'

सुजाताच्या चेहऱ्यावर हास्याची रेघ उमटली.

'पुढे डिग्री घेतल्या घेतल्या घरच्या संमतिशिवाय लग्न. काय ना आई बाबा पण, आधी खपवून घेणार नाही म्हणून सांगितलं आणि लग्नानंतर काही वर्षातच दादा इतका जवळचा वाटू लागला त्यांना विनायक. पण माझं लग्नात नटणं, सजणं राहीलच ना.'

सुजाताला आजही त्या गोष्टीची हुरहुर होतीच.

'पुढे पुणे सोडून नोकरीसाठी मुंबईला काय आलो आणि इथलेच झालो.

नवा मित्रपरिवार मिळाला. वेळोवेळी त्यांनी खुप सपोर्ट केलं. गरज पण होतीच म्हणा कुणाच्या ना कुणाच्या सपोर्ट्ची, संकटं म्हणून तरी काय कमी आली का. बिचाऱ्या विनायकने खुप खुप सोसलं. माझ्या अचानकपणे आलेलं वांझत्वाचा पण किती मोठ्या मनाने स्वीकार केला त्याने. त्याची तर किती स्वप्न होती, पण माझ्या नशीबामुळे....

त्यात मागील दोन-तीन वर्षांत डॉ. पंडितांकडे वाढलेल्या चक्करा... ते कमी होतं म्हणून की काय, त्यात ह्या दम्याच्या त्रासची भर.

किती म्हणून मनस्ताप होतोय विनायकला. आणि त्यात गेल्या वर्षी...'

सुजाता एकदम सुन्न झाली.

'एकवेळ जे मी सोसतेय ते आनंदाने आयुष्यभर सोसलं असतं. पण...'

आणि सुजाताला त्या काळ्यादिवशीचे डॉ. जयकरांचे शब्द आठवले.

‘बातमी तितकीशी चांगली नाही. माझा संशय खरा ठरला. रिपोर्ट्स पण तेच सांगतायत. तुम्ही खंबीर राहिलं पाहिजे. डगमगून जाऊ नका. जेवढ शक्य आहे, करुच आपण. पण... पण दुर्दैवाने सगळ्याच गोष्टी आपल्या हातात नसतात.’

‘विनायकने कोणाचं वाईट चिंतलही नाही, करणं तर दूर राहीलं आणि त्याला ब्लड कॅन्सर. माझ्या विनायकला... तो पण लास्ट स्टेजला. फक्त काही महिने...’

तिने डोळे उघडले, त्यातील शक्ती नाहीशी झाल्यासारखी. नजर पूर्ण हरवली होती.

‘आयुष्यभर सुख दुःख एकत्रीत भोगली, मग हा त्रास एकट्या विनायकलाच का? का... का मृत्यु आपल्याला आपल्या माणसांपासून दूर करतो? तो सुद्धा एकत्र भोगता आला असता तर...’

तिचे डोळे पाणावले. पापण्यांची उघडझाप करत ते बाहेर येणार नाहित ह्याची काळजी घेत ती पुन्हा बेडरूममध्ये आली.

विनायक पलंगावर शांतपणे पडला होता.

“अहो चहा घेताय ना?” तिने खालच्या आवाजात विचारलं, जेणेकरून तो झोपलाच असेल तर त्याची झोपमोड होणार नाही.

तिची चाहूल लागल्याने त्याने वळून पाहिले आणि कुशी पलटत विचारले “काय म्हणालीस?”

“चहा घेतोस?”

“हो चालेल, चहाला काय आपण कधीही तयार.” म्हणत तो उठून बसला.

सकाळपासून दोनदा केला, एकदाही घेतला नाही, किती मिनत्या केल्या, आणि आता म्हणे कधीही तयार. विनायकसुद्धा ना...

ती बेडरूमबाहेर पडू लागली.

‘ह्याने अजुन गोळयाही घेतल्या नसणार’ ती पुन्हा मागे वळली आणि बघते तर...

विनायक पलंगावर नव्हता. पलंग पूर्ण रिकामा. बेडरूममध्ये कुणीही नव्हतं.

ती गडबडली, गोंधळली.

‘मला परत भास झाला की काय?’ पुटपुटत बाहेर आली.

‘तुम्ही खुप विचार करता. एखाद्या गोष्टीवर तेवढा विचार करायची गरज नसते, तरीही. जे समोर चालू आहे ते तुमचे डोळे पहात असतात, मात्र त्याचवेळी मेंदू बॅकग्राउंडला इतर कोणत्यातरी विचारात व्यग्र असतो. डोळे जे चित्र मेंदूपर्यंत पोहोचवतात त्याच इंटरप्रिटेशन करणं, तसच चालू असलेले विचार ह्यांचा गुंता होतो आणि मनात जे विचार चालू आहेत ते आपले डोळेच बघतायत असा आभास निर्माण होतो. मेडिकली याला आम्ही ‘टॅक्टिल हॅल्युसिनेशन’ (*tactile hallucination*) म्हणतो. कामाचा ताण, फ्रस्ट्रेशन, चिंता, अनुवंशिकता बरीच कारण असू शकतात. हल्लीच्या काळात सर्रास अशा केसेस मिळतात. काळजीचं कारण नाही.’ - डॉ. पंडीतांनी विनायक अणि सुजाताला समजावलं होतं दोन वर्षांमागे.

सुजाताला नियमित औषधं पण चालू होती तरीही अधेमधे भास व्हायचाच. त्यामुळे भास झाल्याचं जेव्हां तिला ते जाणवायचं तेव्हा ती लगेच सावरायची, नॉर्मल व्हायचा प्रयत्न करायची.

आज मात्र तिला जरा विलक्षण वाटलं.

‘म्हणजे विनायक अजुन आलाच नाही आंघोळीहून?’ ती संभ्रमित झाली.

‘जेव्हा असं काही होईल, तेव्हां काही विचार न करता शांत चित्ताने थोडावेळ बसून किंवा पडून रहा. आणि झाल्याप्रकारावर अजिबात विचार नको. इट्स डेंजरस.’

डॉ. पंडीतांचा सल्ला तिने लगेच अंमलात आणला.

आरामखुर्चीवर शांत पडून राहिली. डोक्यातील सगळे विचार बाहेर काढले. सगळी विचारचक्र थांबवली.

तिच्या नेटाच्या प्रयत्नांना थोड यश आलं. थोड्यावेळासाठी तिचा डोळा लागला.

“सुजाता, अगं चहा देतेस ना? झाली माझी आंघोळ.”

तिला खडबडून जाग आली.

विनायकचा आवाज हा भास नाही ह्याची खात्री करण्यासाठी तिने उलट प्रश्न केला “काय म्हणालास विनायक?”

ती खुर्चीला पाठ न टेकवता अधीरतेने विनायकच्या आवाजाची वाट पाहू लागली.

पण निरव शांततेशिवाय काहिच प्रतिसाद नाही.

जाऊन नक्की काय प्रकार आहे हे पहायची तिची हिंमत होत नव्हती.

काय होतय आज असं मला? बधिरता आलीय डोक्याला. आपल्याला नक्कीच विनायकच्या आवाजाचा भास झाला याची खात्री सुजाताला पटली.

तिने खुर्चीला पाठ टेकवली आणि स्वथ पडून राहिली.

काही क्षणांतच पुन्हा एकदा विनायकचा आवाज आला “अगं चहा दे.”

तिने खाडकन डोळे उघडले. गडबडीत उठून बेडरूममध्ये आली. विनायक देवासमोर हात जोडून उभा होता. देवासमोर पेटतं निरंजन होतं.

म्हणजे इतका वेळ त्याने उत्तर दिलं नाही त्या अर्थी तो जप करत असणार. आंघोळीनंतर जप करण्याची सवय होती त्याची.

सुजाताला आत्मविश्वास आला. म्हणजे हा भास नव्हता तर!

“आज काही खरं नाही माझं.” असहायपणे सुजाता म्हणाली.

“का? काय झालं?”

“मला वाटलं आज मला पुन्हा भास झाला की काय?”

“पुन्हा म्हणजे?” अंगात शर्ट चढवत विनायकने विचारलं.

“मघाशी हो, तुम्ही पडला होतात आणि मी तुम्हाला चहा विचारायला आले होते, तुम्हाला औषध घ्यायची आठवण करायला परतून पहाते तर तुम्ही...”

“तू गोळी घे बघु आधी. चहा नंतर दे.”

“मी घेते हो, मघाशी जी आठवण करायला आले होते ते आधी करा. तुम्ही आधी घ्या गोळ्या ते जास्त महत्वाच आहे. आणि उद्या जायचंय जयकरांकडे आहे ना लक्षात?”

“हो ग बाई. एक काम करू, जयकरांची अपॉईंटमेंट मी बदलून परवाची घेतो. तुझ्या दम्याच बघ मला टेन्शन आलंय. वाढलाय हल्ली. उद्या आधी ते निस्तरू. काय ना, आजारांची नुसती व्हराईटी आहे.”

विनायकने तेव्हड्यात एक विनोद करून सुजाताला हसवण्याचा प्रयत्न केला.

सुजाता चहा करायला किचनमध्ये आली. काही विचारात असल्यासारखी होती.

“नको, आपण उद्याच जायच जयकरांकडे, दमा बरा आहे तसा. मी निभावू शकते.”

विनायक यावर काहीच बोलला नाही.

“अहो ऐकताय ना? मी काय म्हणते?”

विनायकचा आवाज नाही. सुजाता बिथरली. तिच्या श्वासांचा वेग वाढला.

“विनायक अहो बोला काहीतरी...” पण कोणाचीच चाहूल नाही.

थबकत थबकत बेडरूममध्ये आली पण तिथं कुणीच नव्हतं.

ती पूर्ण ढासळली. देवासमोर हात जोडून उभी राहिली. लक्ष गेलं तर समोरचं निरंजनही शांत होतं. तिने बाथरूमही उघडून पाहिलं पण विनायक नव्हता.

हे जरा जास्तच होतय. पण माझी खात्री आहे हा माझा भास नव्हता. जे काही झालं ते खरं होतं.

पण जर खरं होतं तर आता असं का? आणि विनायक कुठे आहे? कुठं बाहेर गेलाय की काय? गेला असेल तर मला सांगून का नाही गेला? की सांगून गेलाय आणि मला आठवत नाही? नक्कीच तो भास नव्हता, की होता? की हाच माझा भास आहे? काहीच समजतं नाही. खुप थकवा वाटतोय, पडूया जरा.

सुजाता शांत डोळे मिटुन पडून राहिली. पण डोक्यातील विचार काही जाईनात.

‘विनायक बाहेर नाही जाणार असा. मागच्याच आठवड्यात त्याची तब्येत किती बिघडली होती. अचानक ताप किती वाढला रात्री, आणि कसा तो त्याचा श्वास अडकला. कस त्याने सहन केला इतका त्रास देव जाणे. परमेश्वरा, त्याचे सगळे आजार, त्रास, वेदना मला दे रे.’

तिने तशातच देवाला हात जोडले.

‘रात्री जेवेपर्यंत ठीक होता. नीट जेवलाही होता त्यादिवशी. त्याची आवडती मेथीची भाजी केली होती. किती दिवसांनी काही खावसं वाटतं म्हणाला होता. त्याचा आवडता चहाही झाला जेवणानंतर. झोपलाही शांत होता, पण अचानक काय झालं नी झोपेत श्वास घ्यायला त्रास पडू लागला. वेळीच मला जाग आली म्हणून बरं.

अंग तर चटका बसावा इतकं तापलं होतं.

त्यात त्याचा ‘सुजाता, सुजाता’ आक्रोश. काय करावं सुचेना. हात पाय गळून गेले विनायकची अवस्था बघून. अंगातील ताकतच नाहीशी झाली, घामाने डबडबले मी. श्व्वास पण लागत होता.

तरी नशीब डॉक्टरांना लगेच फोन लागला. माझी तर बोबडीच वळली होती. काय बोलावं सुचेना. एकदम भिरभिरायला लागलं मला, डोळ्यासमोर अंधारी आली.

डॉक्टर काय ते समजले, लगेच येतो म्हणाले. पण मग पुढे....... काय झालं पुढे......’

.

.

.

.

.

.

.

.

.

.

.

.

.

.

दिवेलागणीची वेळ झालेली. लॅच उघडून विनायक घरात आला. खुप दमलेला, डोळे अधिकच खोल गेलेले, त्या खालील काळी वर्तूळं जास्तच गडद झाली होती.

लाईट्स, पंखा लावून तो आरामखुर्चीवर टेकला. समोर टेबल वर उघडलेला पेपर पाहून तो अवाक झाला.

‘सकाळी निघे पर्यंत तर पेपर आला नव्हता, आणि तो इथे.’ तसाच त्याने तो हातात घेतला.

त्याच पानावर एका सदराखाली सुजाताचा फोटो होता.

सदराचं नांव होतं “सहवेदना”!

तेव्हड्यात फोन वाजला. विनायक खुर्चीवरून सावकाश उठला आणि फोन घेतला.

– “हॅलो”

– “हां, बोला डॉक्टर”

– “हो आताच आलो. सकाळी लवकर निघालो होतो.” बोलताना विनायकला धाप लागली.

– “हो, तब्येत ठीक आहे.”

– “तेव्हडंच तर करु शकत होतो मी सुजातासाठी आता. पुर्वी फार इच्छा होती तिची पंचवटीला जायची, पण… राहून गेलं. निदान तिच्या अस्थितरी…” विनायकला गहिवरून आलं.

– “हो. घेतो काळजी.”

– “त्या रात्री तुम्ही वेळेत आला नसता तर… माझी अवस्था पासून सुजाताला दम्याचा अटॅक आला, तशातच तिने तुम्हाला फोन…”

– “मला मागे सोडून स्वतः पूढे निघून गेली.”

– “सावरतोय. पण असं वाटतं की ती आहे… इथेच…” विनायकने घरात एक नजर फिरवली.

– “हो. घेतो काळजी.”

– “येतो. ठीक आहे. ठेवतो.”

फोन ठेवून विनायक आरामखुर्चीत बसला.

त्याचे डोळे भरून आले.

‘सुजाता असती तर…. तर नक्की विचारलं असतं – अहो चहा घेताय ना?’

***

## कुणास्तव.. कुणीतरी

भर दुपारची वेळ. डोक्यावर तळपता सुर्य आग ओकत होता. शिवाने आपला मोर्चा एका वस्तीकडे वळवला.

शिवा... मध्यम वयाचा, गरीबीनी गांजलेला इसम. सतत उन्हातान्हात फिरल्यामुळे रापलेला निबर वर्ण, पायात जुनाट स्लिपर्स, अंगात कळकट्ट कपडे, डोक्यावर जीर्ण टोपी, हाताशी मोडकळीला आलेली सायकल, सायकलच्या हँडलला दोन्ही बाजूला लटकवलेली गोणती, कॅरियरला बांधेलेली ट्यूब आणि तोंडात ठराविक पद्धतीने घालायची साद “ए भंगार बाटली रद्दीSSSSS”

आज काही मनासारखी भंगार खरेदी झाली नव्हती. संध्याकाळी आदिलशेठला काय विकणार, आणि गाठीशी पैसा कसा साठणार हिच चिंता. आदिलशेठ म्हणजे भंगार खरेदी करणारा दलाल.

काही खरेदी होईल ह्या आशेने शिवा त्या वस्तीमध्ये शिरला. सगळीकडे घरांची दाटीवाटी. एक-दोन खोल्यांची लहान लहान घरं. घरांच्याच बाहेर कचरा, पाण्याचे नळ, आंघोळ करणारी माणसं, कपडे धुणाऱ्या बायका, खेळणारी मुलं, सगळीकडे नुसता गजबजाट.

“ए भंगार बाटली रद्दीSSSS, ए पत्रा लोखंड प्लास्टीSSSSक” भुकेल्या पोटीही शिवाने आपलं काम चालू ठेवलं.

“ए इधर आ” एका लुंगी नेसलेल्या वयस्कर माणसाने शिवाला हाक दिली.

“बोलो साब क्या क्या है?”

“बिअर बोतल क्या भाव लेता है?”

“साब तीन रुपया.”

“बहोत कम देता है. मार्केटमें चार रुपया मिलता है”

“नही साब, कोईभी तीन रुपयेसे ज्यादा नही देगा.”

“ठिक है चल, ना तेरा ना मेरा, साडे तीन रुपये में ले.”

“कितना बोतल है?”

“बीस-बाईस रहेगा.”

बाटली मागे दोन रुपये सुटतील. शिवाचा सौदा झाला.
सगळ्या बाटल्या गोणत्यात भरुन शिवाने परत आरोळी दिली. “ए भंगार बाटली रद्दीSSSS”आणि पुढच्या खोलीपाशी आला. खोलीचा दरवाजा अर्धवड उघडा होता. नकळत शिवाने आत एक कटाक्ष टाकला. त्याच्या दृष्टिस एक म्हातारी पडली. सुरकुत्यांनी भरलेलं शरीर, पसरलेल्या पांढुरक्या जटा. अंथरुणावर निश्चल पडलेली. त्या खोलीत अजुन कोणी आहे का हे बघायची शिवाला उत्सुकता लागली. त्याने वाकुन बघण्याचा प्रयत्नही केला पण कोणाची चाहूल लागली नाही. तिची अवस्था पाहून शिवाला वाईट वाटलं.

“ए वहां कुछ नही मिलेगा, बुढिया अकेली है. आगे जा तू.” मगाचचा माणूस त्याच्यावर खेकसला. शिवा निमुटपणे पुढे निघाला.

दिवसभर त्याचं कामाकडे मुळी लक्षच नव्हतं त्यामुळे एकुणातच त्याचा धंदा बेताचा झाला. ती म्हातारी काही त्याच्या मनातून जात नव्हती.

संध्याकाळी दिवसातील झालेली किरकोळ खरेदी घेऊन अदिलशेटकडे जमा केली.

“सेठ वो मेरे काम का कुछ हुआ क्या?” शिवाने आदिलशेठला विचारलं.

“वो नही हो सकता शिवा.” आदिलशेठने त्याला सांगितल.

शिवा हताश झाला आणि तिथून चालू पडला.

रोजप्रमाणे रात्री चार पाव आणि बिडीच बंडल घेऊन तो आपल्या झोपडीकडे परतला. त्याने झोपडीत दिवा लावला, हात पाय धुवून आणलेला पाव कसल्याश्या लालभडक रस्स्यासोबत फस्त केला.

रात्री उशिरापर्यंत त्याला झोप नव्हती. म्हतारीच्या विचारात किती बिड्या शिलगावल्या त्याचा पत्ताही नव्हता त्याला. खुप अधीरतेने झोपडीबाहेर तो येरझाऱ्या घालत होता. मध्यरात्रीच्या सुमारास त्याचा थोडा डोळा लागला.

सकाळी उठून शिवा आपल्या दिनक्रमाला लागला. डोळे जड होते, रात्री म्हणावी तशी झोपही लागली नव्हती. सायकलला गोणती लटकवून शिवा चालू पडला. नकळत त्याचे पाय कालच्या वस्तीकडे वळाले. वास्तविक त्याच्या धंद्यात एकदा गेलेल्या ठिकाणी पुढचे १०-१५ दिवस सहसा जात नसत. परंतु त्या म्हातारीला बघायला तो बेचैन होता.

आपली नेहमीची आरोळी ठोकत तो म्हतारीच्या घरापर्यंत पोहचला. आज मात्र घराचं दार बंद होतं. शिवा थोडा हिरमुसला. काही क्षण तिथे घुटमळून पुढे जाणार तोच मागून त्याला हाक ऐकू आली.

“ए शिवा.” त्याने वळून पाहिलं.

“गंगे तू इथं?” शिवाने विचारलं.

गंगू.. शिवाच्या झोपडपट्टीत रहाणारी मोलकरीण मुलगी.

“आर माझ्या कामाची चार घर हायेत इथं.”

“त्या म्हातारीच्या घरीभी करतीस काम?”

“नाय रे. ती बिचारी कुठून देनार माझी मजुरी? एकलीच रहाते.”

“म्हन्जे?”

“आता म्हन्जे काय?”

“म्हंजी सगं कोन नाय?”

“आसल पन ते तिला म्हाईत नाय.” शिवाने आश्चर्याने डोळे विस्फारले.

“आरं म्हातारीची सुध हरपलीय. तिला मागलं कायभी आठवना झालय.”

“आनि नवरा?”

“तो गेला पाच वर्षामागं. दोघे ह्या खोलीत रहायला आले आन तो लगेचच गेला. हिच्याबद्दल वस्तीत कोनाला काय म्हाईत नाय. पन शेजारी-पाजारी समदे काळजी घेतायत. जमेल तशी तिची मदत करतात. मी भी हातभार लावते. दिवसाआड येते आन झाडलोट करून देते.”

शिवाला गंगूचं कौतुक वाटलं “लय चांगलं करतीस बघ.”

“इथली लोकभी आसच बोलतात मला. आपन होईल तेव्हड करायच. पन आपल्याला मानतात बघ सगळे, म्हातारी पन आनि आजुबाजुचे पन.”

शिवा लक्ष देऊन ऐकत होता.

“तरी सवताची खोली हाय, नाहीतर म्हातारीचे हाल व्हते बघ.”

शिवा जरा सुखावला. “व्हय तेबी हाय.”

“बाकी तुझा धंदा पानी कसा चाल्लाय?”

“कसला काय. काय जोर नाय. आज आजुनपर्यंत खरेदी नाय बघ”

“व्हईल व्हईल. मी चलते, मला आजुन एक घर बाकी हाय.” गंगू घाईत निघाली.

शिवाने तिला अडवलं “ऐक, म्हातारीच्या घरातून काय जुन-पुरान मिळतं काय बघ की.”

“तिच्याकडे काय आसनार?”

“अग बघ की जरा. काही चालल, माझा धंदाभी व्हईल आन म्हातारीला चार पैस भी मिळतील.”

गंगू शिवाची विनवणी टाळू नाही शकली.

“बरं विचारते.”

गंगू दार लोटून खोलीत शिरली. शिवा उघड्या दारातून आत न्याहाळत होता. “आजे..” गंगूने म्हातारीला हाक मारली. ती कशीबशी अंथरूणातून उठत म्हणाली, “काय ग, काय झालं?”

“काय नाय, तुझ्याकड काही जुन लोखंड, प्लाष्टीक आसल तर बघ, बाहेर भंगार गोळा करायला आलाय.”

“लक्षात नाही येत, पण वरती माळ्यावर काही आसल.” म्हतारी थकलेल्या आवाजात म्हणाली. “तुझ्या वळखिचा हाय तो?”

“व्हय. आमच्या शेजारी रहातो, शिवा.” गंगूने माळ्यावर चढत उत्तर दिलं.

शिवा म्हातारीला एकटक निरखुन बघत होता. म्हतारीने पण त्याला एकदा पाहून न पाहिल्यासरखं केलं, तरी त्याची नजर हटली नाही.

“हे बघ हे मिळालं.”

गंगूने माळ्यावरून एक गोणतं खाली काढलं आणि बाहेर शिवासमोर ठेवलं. म्हातारीही गंगू मागे बाहेर आली.

शिवाने आतील वस्तू पाहिल्या आणि वजन न करताच म्हतारीचा हातात शंभराची नोट ठेवली. त्याच्या अशा वागण्याचं गंगूलादेखील आश्चर्य वाटलं.

गोणता पाठीला लावताना अजाणतेपणे त्याच्या तोंडून “येतो माय” असे शब्द निघाले आणि करुण भावाच्या डोळ्यांनी म्हतारीला निरोप दिला.

म्हातारी स्तब्धपणे त्याच्याकडे बघत बसली.

गंगूच्या आश्चर्याचा ओघ ओसरला तसा तिने म्हातारीचा निरोप घेतला. “येते ग आजे.”

“काय रं, एकदम शंभर रुपय?” गंगूने आपली शंका शिवापुढे मांडली.

शिवा कसल्याशा विचारा गर्क होता. “आर, काय म्हनते मी?”

“कळालच नाय मला. आलगद झालं. वाटलं गरज आसल तिला.” आजपर्यंत कोणासाठी दमडीपण न उधळलेल्या शिवाच्या औदार्याचं गंगूला आश्चर्य वाटलं.

“पण तुझ्यामुळ म्हातारीला भेटता आलं. लय बर वाटल बघ तिला भेटून. अस वाटल की ती कोनी परकी नाय.”

गंगूने स्मित केलं.

“का कुनास ठाऊक, पन मला तिला कुठतरी पाहिल्यासारखं वाटतय.”

“बर, चल निघते मी.” कामाच्या घाईने गंगूने शिवाचा निरोप घेतला.

आजही शिवाचं कामात मन लागेना. तो तिथुन तडक आपल्या झोपडीवर आला. त्याला खुप बेचैन वाटत होतं. पूर्ण दुपार त्याने बिडीच बंडल धुर करण्यात घालवली. नाहक शंभर रुपये गेल्याचं त्याच्या मनात सुद्धा आलं नाही.

काहीतरी झालं तसं ताडकन उठून म्हातारीकडून आणलेल्या वस्तु त्याने गोणत्यातून बाहेर काढल्या. त्यात जुन फुटकं घमेलं, लोखंडी तवा, रिकामे चेपलेले पेंटचे डबे, आणि बारीक सारीक लोखंडी सामान होतं.

त्यातील एका वस्तुकडे तो नुसता पहात बसला. त्याने ते अंगातल्या शर्टाने पुसलं आणि जमेल तेवढं स्वच्छ केलं. ते होतं एक छोटसं मेडल.

त्याच्या हातात जे होतं त्यावर त्याचा विश्वास बसेना. त्याने ते मेडल चारही बाजूने निरखून पाहिलं. आणि त्याचा चेहरा एकदम खुलला.

तो उठला आणि घाईने गंगूकडे आला. “गंगे, ए गंगे..”

“काय र, असा आग लागल्यागत बोंबलायला काय झालं?” गंगूच्या बापाने, केश्याने विचारलं.

“गंगू कुठ हाय?”

“आलीच बघ ती.” केश्याने मान वर करत सांगितलं.

“काय र शिवा?” गंगूने विचारलं.

“हे बघ काय.” शिवाने ते मेडल गंगूला दाखवलं.

“काय हाय हे?”

“मला विश्वास नाय बसत. तुला माहितेय ना मी पाचव्या वर्गापर्यंत शाळा केलीय.”

“व्हय. मग?” गंगूला पुर्वी शिवाने त्याने पाचवी पर्यंत शिकल्याचं सांगितलं होतं.

“मी पळन्यात पटाईट होतो. शर्यतीत नेहमी पहिला नंबर असायचा. मला आजुन डोळ्यासमोर हाय तो दिवस.” शिवा बोलताना पूर्ण हरपला होता. “शाळेत स्पर्धा चालू होती. मी नेहमीप्रमाणे जितलो आणि हे भेटलं मला.”

त्याने हातातलं मेडल त्या दोघांसमोर धरलं.

“आसल, पन आज का दावतोयस असा लगबगीनं?” गंगूने शंका काढली.

“कारन ते आज मला सापडलय.”

“आता कुठं सापडलं ते?”

“तुला विश्वास नाही बसनार, मला ते त्या म्हातारीकडून आनलेल्या मालात सापडलं.” गंभीरपणे शिवा म्हणाला.

“काय?” गंगू थबकली.

केश्याला काही कळेना. “कोन म्हातारी? कोनाबद्दल बोलतोय?” त्याने प्रश्न मांडले.

“अर बा…” गंगूने सगळी हकिकत केश्याला सांगितली.

“पन कशावरून तू सांगतोस हे तुझ हाय?” गंगूने पुन्हा शंका काढली.

“हे दिसतय?” शिवाने त्याच्यावरती कोरलेलं ‘S’ हे अक्षर दाखवलं. “मला आजुन आठवतय हे मी कोरल व्हत.”

“मला नाय बा पटत, इतकी वर्स गेली आन तुला हे आठवतय.” आता केश्याने शंका काढली.

“आर हे माझ्या हाताने कोरल व्हत. आनि हा लोखंडी डाग दिलेला दिसतोय? घरी आनताना हे माझ्या हातून पडल आनि त्याचा पितळी पत्र्याला चीर गेली म्हनून केलं मी, नायतर बा ने बेदम मारला आसता. राक्षस व्हता तो.”

शिवाच्या आई-बापाबद्दल कोणाला काहीच माहीत नव्हतं, आज पहिल्यांदाच तो आपल्या पुर्वायुष्याबद्दल आणि आई-बापाबद्दल बोलत होता.

“शेवटी सावत्रच होता ना.”

“सावत्र?” गंगूने विचारलं.

“मी लहान असतानाच माझा बा गेला. आईन दुसर लग्न केलं. आन माझा छळ झाला चालू. माझ्या आईने पन त्याला खुप विरोध नाय केला. मातेर झाल बघ माझ. घरातून हाकलला मला. जेमतेम दहा वर्साचा व्हतो.” शिवाच्या डोळयात पाणी दाटलं.

“गाव सोडलं नि इकडे आलो. रस्त्यावर राहिलो, उपाशी पोटी पानी पिऊन दिवस काढले र मी. तेभी आई जिती आसताना. पोट भरायला काहीच नव्हत, भीक पन नव्हती मागायची. ठोकर खात खात ह्या धंद्यात पडलो.”

शिवाने शर्टाच्या बाहिने डोळे पुसले. केश्या आणि गंगूला पण भरून आलं. केश्याने शिवाला एका मोडक्या स्टुलावर बसवलं. गंगूने पाणी आणून दिलं.

“उगाच मागच्या आठवनी नको उगाळू.” केश्याने शिवाच्या खांद्यावर हात ठेवत म्हटलं.

“पन मग ते मेडल का काय ते तिच्याकड कस आल?” गंगू पुटपुटली. “म्हनजे तिच तुझी आई तर…” वाक्य अर्धवट ठेवत, कपाळपट्टिवर आठ्या उमटवत विचार करू लागली.

शिवाच्या चेहर्‍यावरचे भाव बदलले, त्याच्या चेहर्‍यावर आश्चर्य होतं. त्याने विस्फारलेल्या डोळ्यांनी गंगूकडे पाहिलं आणि तो परत कसल्याश्या विचारांच्या अधीन झाला.

केश्याला पण नशीबाच्या ह्या खेळीचं आश्चर्य वाटलं. “आर देवा! खरच आस असल? काय म्हनाव ह्याला देवाची करनी, नशीबात पन काय काय लिवलेल आसतय.”

गंगूचा चेहरा खुलला. शिवासाठी ती खुष झाली.

शिवा मात्र धीरगंभीर. त्याच्या डोक्यात काहीतरी चालू होतं.

“आर कसला विचार करतोयस? काय झाल? तुला नाय वाटत ती तुझी आई आसल?” केश्याने विचारलं.

“आसल. मागल्या दोन दिवसात जे काय काय झालं त्याचा अर्थ आता कळतोय मला.” शिवाची नजर शुन्यात हरवलेली.

“म्हन्जे?” गंगूने विचारलं.

“म्हन्जे का माझे पाय तिच्या खोलीकड वळाल, का मला तिच्या एकलेपनाबद्दल वाईट वाटलं, का तिची काळजी वाटून राहिली आनि का शंभराची नोट माझ्या हातून नकळत गेली.”

गंगूने मान हलवून सहमती दर्शवली. “आन दुपारलाच तू मला बोलला व्हता की तुला तिला कुठतरी पाहिल्यागत वाटतयं.”

“आर हा वरच्याचा संकेत आसल, तुझ्या आन तिच्या नशिबात भेट आसल म्हनुन तुला तशी बुद्धी झाली.” केश्याने शिवाला वडीलधाऱ्या माणसाच्या भुमिकेने समजावलं.

शिवाचा चेहरा धास्तावलेला होता.

“आता खुश व्हायच सोडून, असा उदास का बसलाय?” केश्याने शिवाला झटकला. “आता माय लेकरु ज्याक -हावा एकत्र.”

शिवाने नकरार्थी मान हलवली. “ते नाय शक्य.” शिवाच्या आवाजात गंभीरता होती.

“का र? येड लागला का तुला?” केश्याने शिवाला फटकारलं.

“लहानपनापासून जे हाल मी भोगलेत त्याला माझ्या सावत्र बा एवढी ती पन जवाबदार हाय. माझ आयुष्य नासवलं, ना निट आसरा, ना पोटाला चार घास. आर तो बा सावत्र होता पन ही तर सख्खी आई होती ना माझी? म का नाय कधी आडवला तिने बा ला?”

“हे बघ ती कशावरुन तुझ्या बा ला घाबरत नसल? तिला काय बोलायची, करायची मुभा नसल तर?”

केश्याच्या प्रश्नाने शिवा निरुत्तर झाला.

“आर आई तुझी ती. इतक्या वर्सानें भेटली, त्या परमेस्वरानं गाठभेट घातली तुमची. आस करु नको शिवा, जे झाल इसरुन जा.” केश्याने समजावलं.

“आनि ती एकलीच हाय र, इतके महिने मी तिच्याकड जाते, लय मायाळू वाटते र.” गंगूने त्यात भर घातली.

शिवा थोड नरमला. “पटतय मला तुम्ही काय म्हनता ते.”

“उद्या जाऊ आपन तिकडे, बा तु भी चल आमच्यासोबतीन. म्हातारी लय खुष होईल आनि वस्तीवाले पन. तिची लय काळजी हाय समदयाना.”

गंगूने शिवाला बोलायची संधीच दिली नाही. ती खुप खुष होती, त्या दोघांसाठी.

रात्रभर शिवाला झोप लागली नाही. एक प्रकारची अधीरता, रुखरुख त्याच्या मनात होती.

सकाळी गंगू आणि केश्या त्याच्याकडे आले. “शिवा ए शिवा.” गंगूने शिवाला बाहेर बोलवण्यासाठी हाका मारल्या. शिवा स्वच्छ आंघोळ, बऱ्यापैकी कपडे करुन तयारच होता. तिघेही थोड्या वेळात म्हातारीच्या घरी पोहोचले.

“आजे, ए आजे.” गंगूने दार ठोठावलं.

बराच वेळ काहीच चाहुल नव्हती.

“आजे..” गंगूने पुन्हा हाक मारली.

चार-पाच शेजारीही जमले. सगळ्यांना काळजी वाटू लागली. आता सगळ्यांनीच म्हतारीला हाका मारायला सुरुवात केली.

“काल रात्री खोकत होती जोरात” जमलेल्यापैकी एकजण बोलला “मला वाटलं नेहमीसारखं असेल..”

शिवालाही काळजी वाटू लागली. मनात शंकेची पाल चुकचुकली, भलते-सलते विचार येऊ लागले.

तेव्हड्यात म्हतारीने ग्लानीने भरलेल्या डोळ्यांनी दार उघडलं. सगळ्यांचाच जीव भांड्यात पडला.

“काय किती येळ ग.” गंगू फक्त रडायची शिल्लक होती.

“आग डोळा लागला होता.”

शिवाला तिथे आलेला बघून तिला आश्चर्य वाटलं.

“आजे तुझ्यासाठी खुषखबर हाय बघ. आनि आपल्या समदयांसाठी भी.” गंगूने तिने जमलेल्या सगळयांना सांगितलं.

“व्हय.” केश्याने शिवाच्या खांद्यावर हात ठेवत सगळयांची उत्सुकता वाढवली.

त्या सगळ्यांइतका शिवाही अधीर झाला होता, सगळ्यांची आणि म्हातारीची प्रतिक्रिया बघायला.

जवळ जवळ सगळ्यांनी काय खुषखबर म्हणून विचारलं. गंगू स्मित करत म्हातारीकडे बघत होती.

“बोल की ग, काय आहे?” म्हातारीने विचारलं. गंगूने शिवाकडे पाहिलं. त्याची नजर म्हातारीच्या चेहर्‍यावर खिळलेली. डोळयात तेच करूण भाव, त्यात काहितरी मिळवण्याची आस होती.

“आजे तु एकली न्हाईस. तुला एक मुलगा हाय.” म्हातारी थबकली, तिला आपल्या कानांवर विश्वास बसेना, पण पुढचं ऐकायला कान तरसलेले.

“हा शिवा हाच तुझा मुलगा.” गंगूने म्हातारीचा हात हातात घेतला.

म्हातारीच्या तोंडून शब्द फुटेनात. आश्चर्य आणि आनंद यामध्ये कुठेतरी तिच्या भावना अडकल्या. चेहरा केविलवाणा झाला.

“खरंच” गंगू हसत म्हणाली.

“मला तसभी काय आठवत नाय, पन.... आसल.” शिवाकडे बघताना म्हातारीच्या डोळयातून पाणी तरळलं.

गंगूने आणि केश्यानी सगळी कहाणी म्हातारीला आणि शेजाऱ्यांनी सांगितली. सोबत आणलेलं मेडल दाखवलं.

कोणाला आनंद झाला तर कोणाला आश्चर्य वाटलं. म्हातारीच्या आश्चर्य, प्रेम, ममता, आनंद अशा सगळ्याच भावना उफाळून आल्या. शिवाच्या डोळ्यातही पाणी दाटलं.

“आये.” अस काही पुटपुटत तो म्हातारीसमोर उभा राहीला. तिने दोन्ही हात त्याच्या डोकयावरून फिरवले. “हा दिवस बघायलाच देवानं मला अजुन जिवंत ठेवली वाटतं.”

तिच्या अश्रुंचा बांध फुटला. गंगूच्याही डोळ्यातून पाणी वाहू लागलं. शिवाने मात्र स्वतःला सावरलं.

.

.

.

.

त्यादिवसापासून शिवा मोठ्या आनंदाने आपल्या आईसोबत राहू लागला. तिची काळजी घेऊ लागला. तिच्याबद्दलच्या कटू भावना त्याने मनातून काढून टाकल्या. तिच्याही जगण्याचं सार्थक झालं. झालेला स्म्रुतीभंश, आलेलं वार्धक्य तिच्या नशीबाच्या आड नाही येऊ शकले. पोटचा मुलगा इतक्या वर्षाने भेटलाच.

ह्यालाच तर नशीब म्हणतात. जे लिहिलेलं असतं ते मिळतचं. पण असं म्हणतात माणूसच स्वतःच आपलं नशीब घडवतो, आणि त्याबरोबर कधी कधी इतरांचही!

त्यानंतर शिवाने तीन-चार दिवस कामाला विश्रांती दिली.

एकदा त्याला रस्त्यात अदिलशेठ भेटला.

“क्या शिवा है किधर? दो-चार दिन आया नही तू माल लेके.” अदिलशेठने चौकशी केली.

“हां थोडा काम मे उलझा था. कलसे आयेगा.”

“ठीक है, और मैने सुना तुने तेरी झोपडी बेच दि.”

“और क्या करता, आपसेभी मांगा था, पर हुआ नही. तो कोई चाराभी नही था.”

“मैं तेरी मदत करना चाहता था खुदा की कसम, मगर तुने जो रकम मांगी थी बहुत ज्यादा थी.”

आदिलशेठने त्याला समजावलं.

शिवा शांत होता.

“लेकिन हुआ क्या मां का ऑपरेशन?”

“अगले हफ्ते करनेका बोला है डॉक्टर.”

“और तेरा भाई है ना गांवेमे तेरी मांके साथ?”

“हां, उसने भी जोडा पैसा, बाकी मैने जोडा झोपडी बेचकर.”

“फिर रहता किधर अभी? फुटपाथपे?”

“नही सेठ. एक बुढियाके साथ. सिरपे छप्परके लिए कुछ ना कुछ तो करना पडेगा ना.... तो कर दिया.”

शिवाने स्मित केलं आणि तिथुन चालू पडला.

.

.

.

.

.

दिवस असेच पालटत होते. म्हातारीची प्रकृतीही दिवसेंदिवस ढासळत होती. तिच्या शेवटच्या घटकेत तिच्या सोबत असणं शिवाच्या नशीबात नव्हतं. तो कामावर घराबाहेर असताना तिने प्राण सोडला. ती मरणघटका मोजत असताना गंगू मात्र तिच्यासोबत होती. म्हातारी गेल्याने तिला अतीव दुःख झाले.

शिवाने मात्र नेहमीप्रमाणे स्वतःला सावरलं. अश्रुंनी त्याच्या डोळ्याच्या कडा काही ओलांडल्या नाहित. आतुन तो निर्धास्त झाला होता. आता तो त्या खोलीचा मालक होता. सगळ्या गोष्टी जुळवून आल्यासारख्या त्याच्या पथ्यावर पडत होत्या.

त्यानंतर दोन दिवसांनी शिवा काही कामानिमित्त केश्याकडे आला. झोपडीबाहेर असताना शिवाला केश्याचा आणि गंगूचा संवाद कानी पडला.

“गंगे, आता उद्यापासून कामावर जायला सुरु कर. किती दिवस म्हातारी गेल्याचा सोक करनार अजुन? तिला जाऊन झाले की दोन दिवस.”

“तिचा माझ्यावर लय जीव होता रं. बघकी शेवटाला पन माझ्या हातूनच पानी घेतलं.”

“ते खर हाय, पन मला ह्या शिवाचं नशीब काही समजत नाय बघ, इतक्या वर्सानं त्याला आई भेटली पन महिन्या दिड महिन्यातच.... ”

गंगूने आसवं टिपली, तिचा चेहरा गंभीर झाला. “बा, जाताना आजे मला काय बोलली म्हायतेय?”

“काय?”

“की शिवा तिचा पोरगा नाही. शिवाला वाटलं की ती आई हाय त्याची पन आजेला माहीत होतं की शिवा तिचा पोरगा नाही. ती मला म्हनाली की मला मागचं काही आठवत नसलं तरी मी कधी कोनाला जन्म दिला नाही हे पक्क. पन त्या लेकराला माझ्यात त्याची आई दिसली आनि भेटली, ते पन इतक्या वर्सानं, तर कसं मोडू त्याचं मन. लेकराला त्याची आई भेटल्याचं सुख तरी मिळालं आनि मला मरायच्या आधी आई झाल्याचं! शेवटी आई ती आई असते, ती खरी खोटी नसते.”

बाहेर शिवा सुन्न, निस्तब्ध उभा होता. हालचाल होती ती फक्त दुःखाश्रुंची, यावेळी मात्र त्यांनी डोळ्यांच्या कडा ओलांडल्याच.

***

## पत्रास कारण की...

ते दिवस मला आजही जसेच्या तसे आठवतायत. त्यावेळी ब-याच पोस्टल कर्मचा-यांच्या बदल्या झाल्या होत्या. माझी ही झाली आणि माझं संकट आणखी मोठं झालं. उतार वयामुळे माझ्या आईची तब्येत खूप खालावली होती. पण नशिबाने मला माझ्या त्या वेळेच्या राहत्या घरापासून तसं जवळच हलवलं गेलं. मी मूळचा राजापूरचा. राजापूर कोंकणातलं एक टुमदार गाव. आता त्याला शहर अशी ओळख मिळाली असेल, पण १९८९ मध्ये ते एक गावच होतं. माझी बदली भांबेडला झाली होती. भांबेड तसं खूप छोटं गाव, पण आजूबाजूच्या दुर्गम भागात तेच एक मोठं.

भांबेड आणि आजूबाजूची पाच-सात गावं सह्याद्रीच्या पायथ्याशी वसलेली. कोंकणाचा पूर्वेकडील अगदी शेवटचा भाग. गावातून समोरच विशाळगडचा भव्य कडा दिसायला.

भांबेडचे पोस्टाचे मास्तर होते हरी वैद्य. मध्यम वयाचे. त्यांनीच मला त्यांच्या ओळखीने पळशीकरांच्या घरामागील एक खोली भाड्याने मिळवून दिली. पोस्टही तिथून जवळच होतं. पोस्टात माझ्या व्यतिरिक्त अजून एक पोस्टमन होते - रघुवीर माळवदे. वैद्य साहेबांनी पहिल्या दिवशीच मी आणि माळवदे कोणते प्रभाग करणार हे निश्चित केलं. मला आजूबाजूचा परिसर तसा ऐकून माहीत होताच. दिवसात वाटायची पत्रही खूप नसायची. हा, फक्त आजूबाजूच्या दोन-चार फर्लांगावर असलेल्या गावतही सायकल ताबडवत जायला लागायचं एवढंच.

हळू हळू मी रुळत होतो, परिसराशी जमवून घेत होतो. थोड्याफार ओळखीही होत होत्या. चहावाला किसन, भुसारी किराणावाले सतारशेठ वगैरे मंडळी जवळची झालेली. आसपासची गांवही एक दोनदा फिरून झालेली.

असंच एक गाव होतं.. प्रभानवल्ली. भांबेडपासुन ४ फर्लांगावर. मुचकुंदि नदीच्या काठी वसलेलं, सहा सात वाड्यांचं एक छोटंसं गाव.

मला आठवतंय, त्या दिवशी प्रभानवल्लीला जायची माझी पहिलीच वेळ होती. प्रभानवल्लीच्या पोलिस पाटीलांचं एक रजिस्टर्ड पत्र आणि त्याच मार्गावर असलेल्या कोर्ले ह्या गावची काही पत्रं होती. मी ती घेतली आणि माझ्या दप्तरात भरली. किसन कडे एक चहा घेऊन आलो आणि मार्गस्थ झालो. कोर्लेतील पत्रं वाटून, प्रभानवल्लीला पोलिस पाटील जमदाडेंच्या घरी पोचलो.

जमदाडेंशी ती माझी पहिलीच भेट. माणूस मोठा उमदा वाटला. मी ह्या भागातील नवीन पोस्टमन म्हटल्यावर, त्यांनी माझी विचारपूस केली.

“कुठले तुम्ही?”

“मी राजापुरचा. दोन वर्षांमागेच नोकरी सुरू केली.”

“घरी कोण असतं राजापूरला?”

“आई आहे,बायको आहे, धाकटा भाऊ आहे. वडील गेले दोन वर्षांमागे.”

“मग बायको तिकडेच का?”

“हो. आईची तब्येत बरी नसते. बाकी कामं पण आहेत. म्हशी आहेत, चार घरचा रतीब आहे. माझी आठवड्याला फेरी असते.”

“बरं, भांबेडला कुठे राहता?”

“पळशीकरांच्या खोलीत.”

“पळशीकर म्हणजे दिगंबर पळशीकरांपैकी?”

“हो हो.”

“माझं आठवड्याला येणं असतं भांबेडला. गुरुवारचा बाजार असतो ना भांबेडला.”

“हो.”

“जेवण्या खाण्याचं कसं मग?”

“शिजवतो खोलीवर मीच.”

“बापरे हालच की हो एकट्याने राहायचं, जेवण-खाण करायचं.”

“काय करणार. पर्याय नाही.”

जमदाडेंनी आपुलकीने चहा पाजला. पत्र देऊन, मी त्यांचा निरोप घेतला. उंबरठा ओलांडताच मला लक्षात आलं की मी पोच पावतीवर जमदाडेंची सही घेतली नव्हती. मी तसाच मागे वळलो. सही घेण्यासाठी दप्तरातील वही काढली आणि मला थोडं आश्चर्य वाटलं. दप्तरात एक पोस्टकार्ड होतं. प्रभानवल्लीत तर एकच पत्र होतं, जे मी जमदाडेंना सुपूर्त केलेलं. कोर्ले मध्ये पत्र द्यायचं राहिलं असेल असं समजत मी पत्र बाहेर काढलं. पण त्यावर प्रभानवल्लीचाच पत्ता होता.

“कसं शक्य आहे?”

माझं पुटपुटणं जमदाडेंच्या कानावर पडलं. “काय झालं?”

“विशेष काही नाही, मी पोस्टातून निघताना हे पत्र दप्तरात नव्हतं. आणि आता.. द्यायचं तुमचं एकच पत्र होतं. मग हे कुठून आलं. कोर्लेत पत्रं वाटताना आणि तुमचं पत्र देताना हे पत्र दप्तरात नव्हतं. मला खात्रीशिर आठवतंय.”

जमदाडेंनी हसण्यावारी नेलं. “ही तर भुताटकीच म्हणायची.” ते पुन्हा एकदा मोठ्यांदा हसले. मी पण जास्त विचार न करता त्या कार्डावरील नाव पाहिलं.

“पाटील साहेब, हे नरेंद्र गणू सातपुते कुठे राहतात?”

“म्हणजे ते भुताटकीचं पत्र न-याचं आहे होय.” जमदाडेंची थट्टा अजून सुरूच होती.

मीही अवघडून स्मित केलं.

“इथनं सरळ जा ग्रामपंचायतीपर्यंत. तिथून खालच्या अंगाला नदीपर्यंत जा. तिथच आहे सातपुतेचं घर.”

मी ग्रामपंचायतीपर्यंत पोचलो. सायकल तिथे उभी करून, चालतच सुतारवाडी मधलं सातपुतेचं घर शोधलं.

घर, अगदी जुने, ओबढधोबड खांबांनी टेकू दिलेले, जीर्णशीर्ण भिंतीचे, घर. मी निवडुंगाच्या वेशीलगोलग असलेल्या बांबुच्या फाटकातून आत गेलो. बाहेरील ओसरीवर एक इसम बसला होता.

“नरेंद्र सातपुते, पत्र..”

तो निर्विकारपणे जागचा उठला.

“पत्र.”

मी कार्ड त्याच्या हातात ठेवलं. तितक्यात एका बाईने, बहुदा त्याची बायको असावी, दारातून डोकावलं. मी न बघितल्यासारखं केलं आणि तिथून चालू पडलो.

का कुणास ठाऊक पण ते घर एकदम निर्जीव वाटलं. त्या घराची अवकळा, तिथली उदास माणसं की आणखी काही, मला नव्हतं माहित. सायकल घेतली आणि थेट भांबेड गाठलं.

त्या दिवशी मी थोडा बेचैनच होतो. संध्याकाळी, तिथली ग्रामदेवता, आदिष्ठीदेवीच्या देवळात जाऊन बसलो. मनाची घालमेल थोडी कमी झाली. रात्री लवकरच झोपलो.

त्यानंतर दोन एक दिवस झाली असतील. मी सकाळीच पोस्टात गेलो होतो. नवीन पत्रांचं स्टॅम्पिंग करून, किसनकडे सकाळच्या चहाला गेलो.

“किसनभाऊ चहा द्या.” किसनने चहा दिला.

“अहो तुम्हाला कळलं असेलच ना?” किसनच्या प्रश्नाचा रोख मला समजला नव्हता.

“कशाबद्दल बोलतोयस?”

“प्रभानवल्लीतले सातपुत्यांबद्दल.”

“त्यांचं काय झालं?”

“त्यांना परवा पत्र आलं म्हणे.”

“हा मग?”

“अहो काल बाजाराचा दिवस होता, प्रभानवल्लीतील बरीचशी लोकं येतात बाजाराला. त्यांनी सांगितलं की ते पत्र आबा सातपुतेंचं पत्र होतं.”

“नाही रे, ते नरेंद्र का कुणी.. हा नरेंद्रच.. नरेंद्र सातपुतेचं होतं.”

“नाही नाही, तसं नाही. ते आबा सातपुतेंनी पाठवलेलं म्हणे. त्यांच्या लेकाला.”

“असेल. मग त्यात काय एव्हडं?”

किसन आवासून माझ्याकडे बघत होता.

“बापाने पोराला पत्र लिहिलं तर त्यात काय? लोकं पण ना..” मी उपहासात्मक हसलो आणि चहाचा घोट घेतला.

“तुम्ही आताच इकडे बदलून आलात, तुम्हाला माहीत नसेल. आबा म्हणजे गणू सातपुतेचा महिन्याभरापूर्वी खून झालाय.”

“काय?”

“पंचक्रोशीतला पहिला खून. माहितेय.” किसन बोलतच होता.

मला एकदम धक्काच बसला. माझ्या हातातला कप खाली पडला.

“अर्रर्र. असूदेत.”

“कशावरून त्याच्या बापाचं पत्र? कुणीपण लिहू शकतं ना बापाच्या नावाने.” मी स्वतःच्या समाधानासाठी शंका काढली.

“आपल्याला काय माहीत बा. लोकं बोलत होती ते सांगितलं. पण कोण कशाला करेल ना असला उद्योग तो पण गेलेल्या माणसाच्या नावानं.” किसनने पडलेला कप उचलला आणि इतर गि-हाईकांमध्ये गुंतला.

किसनचं म्हणणं खरंच होतं म्हणा. कोण कशाला करेल असलं काय. पण जर इतर कोणी हे नसेल केलं तर?.. ह्याचा अर्थ जो काही होत होता तो मानायला मन बिथरत होतं. शक्यच नव्हतं... की... होतं?

होता होता ही बातमी वा-यासारखी चहुबाजूला पसरली. वैद्य, सतारशेठ, पणशीकर, आजूबाजूचे इतर सगळ्यांकडून प्रकाराची विचारणा होत होती.

वैद्यांनी माझ्याकडून परत परत खात्री करून घेतली की त्या दिवशी ते पत्र आधी दप्तरात नव्हतं, पोलिस पाटिलांच्या घरात मला त्याचा उलगडा झाला होता वगैरे.

काही लोकांना हा कुणाचातरी हलकटपणा वाटला, तर भूत पिशाच्च मानणा-या ब-याच लोकांना हे काहीतरी विपरीत आहे असं वाटलं.

हे सगळं होत असताना पत्रात नक्की काय लिहिलंय हा प्रश्न वैद्य सोडता कुणालाच पडला नाही. दुस-या दिवशी त्यांना पडलेल्या प्रश्नाचं समाधानकारक उत्तर त्यांना मिळालं. त्या दिवशी जमदाडे पोस्टात आले, ते पत्र सोबत घेऊनच.

वैद्यांनी ते पत्र नीट न्याहाळलं आणि वाचलं.

“मास्तर, हा काय प्रकार आहे नक्की. गावात सगळीकडे ह्याचीच चर्चा.”

“कार्डावर दोन्ही मोहर आहेत. ही त्या दिवशीची, ह्याच पोस्टाची. पण दुसरी मोहर स्पष्ट नाही तेव्हडी. कुठून आलं हे सांगणं कठीण आहे.”

“काल सरपंच आलेले माझ्याकडे. झाला प्रकार ऐकून ते न-याकडे गेलेले, त्यांनी हे कार्ड त्याच्याकडून आणलं आणि मला देऊन, इकडे पाठवलं आणि काय ते छडा लावायला सांगितला. आता मी काय छडा लावणार?”

“हम्म्म्म.” वैद्यांनी सुस्कारा सोडला.

वैद्यांनी ते पत्र माझ्याकडे दिलं. त्यातील मजकूर साधारण मला आठवतोय.

*चि. नरेंद्र,*

*मी तुझा आबा. तुझा विश्वास बसणार नाही. कसा आहेस पोरा? मी गेल्याने खूप दुःख झालं असेल ना. पण कोलमडून जाऊ नकोस. तुझ्या आईला सांभाळ. मी गेल्याने ती एकटी पडली असेल. तिची काळजी घे रे पोरा. तुझ्यासाठी खूप काही करू नाही शकलो. माफी कर मला.*

*सूनबाईला आणि पोरांना सांभाळ.*

*तुमचा,*

*आबा*

ते मोडक्या तोडक्या अक्षरातील कार्ड वाचून मी बावचळलो. माझ्या समोर जे होतं त्यावर माझा विश्वास नव्हता.

“हे कसं शक्य आहे, पाटीलसाहेब?”

“माझ्या घरी आलेलात त्यावेळी तुम्ही म्हणाला होतात, की हे पत्र आधी नव्हत आणि अचानक ते दप्तरात गावलं तुम्हाला. काय समजत नाही. हे काहीतरी विपरीत आहे.”

“हो. मी पण खात्री करून घेतलीय ह्याची.” वैद्यांनी खुलासा केला.

“मला वाटतं की म्हाता-याचा जीव अडकलाय कशाततरी. त्याच्या पिंडाला पण कावळा नव्हता शिवला.” जमदाडेंची नजर शून्यांत हरवलेली.

“बरं मी असं ऐकलं की त्यांचा खून झाला होता. कोणी केलेला?” वैद्यांच्या प्रश्नाने ते भानावर आले.

“अं… ते… नाही कळाल. तालुक्याहून पोलिस आलेले, पण काही नाही सापडलं.”

जमदाडे निघून गेले.

नंतर काही दिवस सगळं शांत होतं. लोकं विसरले होते किंवा विषय चघळून चघळून अगदी चोथा झाला होता. दरम्याने माझंही प्रभानवल्लीला जाणं नव्हतं झालं.

पंधरा तीन आठवडे झाले असतील, प्रभानवल्लीत कुणाचीतरी मनिऑर्डर आली होती. ती द्यायला मी गेलो होतो.

मनिऑर्डर योग्य माणसाच्या हाती सोपवून दप्तरात पाहिलं तर... माझ्या काळजाचा थरकाप उडाला, मी फक्त कोसळायचाच शिल्लक होतो. मनिऑर्डर घेणा-याने मला आधार दिला.

त्या दिवशीही नरेंद्र गणू सातपुतेच्या नावाने अजून एक पत्र माझ्या दप्तरात होतं. काय करावं मला सुचेना. सातपुतेच्या घरी जावं का सरळ भांबेड गाठावं मला कळेना.

पण पहिल्या पत्रानंतर ज्या शंकाकुशंका काढल्या जात होत्या त्या पाहता, ते पत्र सातपुतेच्या हाती न देण्याची हिंमत माझ्या ठायी नव्हती. मी सातपुतेच्या घरी गेलो. त्या दिवशी मात्र घराचं दार बंद होतं. मला एका अर्थाने माझी ती सुटकाच होत. मला कोणाला सामोरं जायचं नव्हतं. मी दार न वाजवता पत्र दाराखालून आत सरकवलं. आणि लगबगीने तिथून चालू पडलो.

ग्रामपंचायतीकडे आलो ते दोन चार नजरा कुतूहलाने मला हेरत होत्या. बहुदा त्यांना काही अंदाज आला होता. मी तिथून चालू पडलो, एकच अपेक्षा होती, ते पत्र आबा सातपुतेंचं नसावं, ज्याची शक्यता नगण्य होती.

दुस-या दिवशी किसनकडेच मला बातमी लागली, मी आदल्या दिवशी देऊन आलेल्या पत्राची. ते पत्रही आबा सातपुतेचं होतं. ह्यावेळी मला खूप आश्चर्य नाही वाटलं. किसनला मी पत्रातील मजकुराबद्दल काही ठाऊक आहे का विचारलं पण त्याला काही ठाऊक नव्हतं.

संध्याकाळच्या सुमारास वैद्यांनी मला बोलावलं. विषय अर्थातच सातपुते, आणि ते पत्र.
“हो कालही तेच. मी तिकडे असतानाच दप्तरात पत्र दिसलं.” मी हतबल होत वैद्यांना म्हणालो.

“कालच्या पत्रात काय लिहिलं होतं माहितेय, तू वाचलंस?”

“कसं शक्य आहे, कोणाचं पत्र वाचणं?”

“हम्म्म्म.. मलाही मघाशीच कळालं, एकजण आला होता प्रभानवल्लीहून. त्यात लिहिलं होतं की मी, म्हणजे आबा सातपुतेंनी सरपंचाकडून काही कर्ज घेतलं होतं पोरीच्या लग्नासाठी, जमीन गहाण ठेवून.”

“सरपंचाकडून कर्ज?” ती गोष्ट मला तितकी रुचली नव्हती.

“अरे, सरपंचाचा सावकारी हा मुख्य व्यवसाय असं ऐकलंय मी. आजूबाजूच्या सगळ्या गावात तो एकच सावकारी करणारा. तर आता इतकी खासगी बाब पत्रात लिहिलीय म्हणजे बघ.”

मी निरुत्तर होतो. बोलायला काहीच नव्हतं.

“हे सगळं जे चाललंय, ते एका गोष्टीकडेच बोट दाखवतायत.” वैद्य खूप गंभीरपणे म्हणाले.

“कोणत्या?” त्यांना नक्की काय म्हणायचं मला समजलं नव्हतं.

“आबा घुटमळतोय.”

जे काही चाललं होतं ते बुद्धीच्या पलीकडचं होतं आणि मी ही त्याचा एक भाग होतो. मला भांबेडात थोडं अस्वस्थ वाटू लागलं. ह्याची कल्पना मी वैद्यांना दिली आणि चार दिवसाची रजा टाकून राजापूरला आलो. घरच्या लोकांसोबत सगळ्याचा थोडा विसर पडायला मदत झाली हे जरी खरं होतं तरी, कामावर रुजू व्हायला मन धजावत नव्हतं, पण नाईलाज होता. मी ठरल्या दिवशी भांबेडला परतलो.

“मला आता प्रभानवल्ली नको. कृपा करा.” मी वैद्यांसमोर फक्त हात जोडायचा बाकी होतो.

त्यांनी आधी आढेवेढे घेतले. मला आणि माळवदेला नवीन भाग म्हणजे कामं सावकाश होणार, ह्याच्यावरच ते अडून बसले. पण सरते शेवटी माझी विनंती त्यांनी मान्य केली.

माळवदेला थोडे दिवसांसाठी प्रभानवल्ली, कोर्ले दिलं आणि मला नेरवणे च्या आसपासचा भाग मिळाला.

त्या दिवसात माळवदेला प्रभानवल्लीला जायची गरज पडली नाही. मी पण नवीन भागात जमवून घेतलं. दरम्यान, त्याची चुलती का कुणीतरी आजारी पडली, तिला घेऊन त्याला शहरात जावं लागलं. माझ्यावर कामाचा ताण वाढला.

त्या दिवशी स्टॅम्पिंग करायच्या पत्रांत मला प्रभानवल्लीच्या प्राथमिक शाळेचं पत्र दिसलं. मी ते बाजूला काढलं आणि वैद्यांना माझी अडचण सांगितली.

“अरे काय बोलतोयस? पत्र द्यायचं नाही माळवदे येईपर्यंत?”

मी शांत उभा होतो.

“राज्य शिक्षण मंडळाकडून आलेलं पत्र आहे.” हातातील लखोटा नीट न्याहाळत वैद्य म्हणाले.

“मग गावातल्या कोणासोबत पाठवलं तर नाही का चालू.....” वाक्य पूर्ण करण्याची माझी हिंमत झाली नाही .

“काय बोलतोयस. जरा जबाबदारीने बोल. तू प्रभानवल्लीला जातोयस आजच्या आज. ह्या पत्राचं गांभीर्य लक्षात घे.” माझ्याकडे बोलण्यासारखं काहीच नव्हतं. निमूटपणे इतर टपालांसोबत ते पत्र मी दप्तरात ठेवलं आणि पोस्टातून बाहेर पडलो.

प्रभानवल्लीला जाताना मनाची धाकधूक वाढत होती. शाळेच्या बाहेरच मला जमदाडे भेटले. थोडे गंभीर वाटले.

“बरेच दिवसांनी येणं झालं पोस्टमन.”

“हो. सध्या मला नेरवणे गावचा भाग दिलाय.” एव्हाना चार आठ गावक-यांनी आमच्या बाजूला कोंढाळं केलं होतं.

“आणि दुसरा रजेवर आहे म्हणून आज आलो.” मी शाळेचं पत्र काढण्यासाठी दप्तर उघडलं आणि…

“काय झालं?” माझा धास्तावलेला चेहरा पाहून जमदाडेंनी विचारलं.

मी कपाळावरील धर्मबिंदू शर्टाच्या बाहीने टिपले, माझ्या घशाला कोरड पडली. पाठीच्या कण्यातून एक शिरशिरी गेली. हातात बळ नसल्यासारखं, अत्यंत संथ गतीने, शाळेच्या लखोट्यासोबत असलेलं ‘ते’ पत्र मी बाहेर काढलं.

“आज पण?” – जमदाडे.

माझ्या तोंडून शब्द फुटेना. मी जड पावलांनी शाळेत जाऊन लखोटा देऊन आलो. तोपर्यंत अजून थोडे गावकरी जमलेले, त्यांत नरेंद्र सातपुते पण होता. ‘ते’ पत्र मी नरेंद्रच्या हाती सोपवलं. गावक-यांत कुजबूज सुरू झाली.

जमदाडेंनी सगळ्यांना मागे हटवलं आणि नरेंद्रच्या जवळ आले.

“काय लिहिलंय?” जमदाडेंनी बिथरलेल्या नरेंद्रला विचारलं.

“वाचतो.” नरेंद्रने आवंढा गिळत हळू आवाजात वाचायला सुरुवात केली.

*चि. नरेंद्र,*

*खूप घुसमट होतेय रे माझी. खूप अस्वस्थ वाटतंय. तुमच्यासाठी रक्ताचा घाम करून, पै पै साठवून घेतलेल्या जमिनीलाच तुम्ही वंचित झालात. मी जे सावकाराकडून ८००० चं कर्ज घेतलं होतं, ते मी हळू हळू फेडलं होतं. पण तो काही जमिनीचे कागद द्यायला तयार नव्हता. खूप वेळ प्रयत्न केला आपण पण तो दाद देत नव्हता.*

*त्या संध्याकाळी, मी पोलिसात तक्रार नोंदवणार हे त्याला सांगितलं. पण त्याच रात्री, नदीकाठी, सावकार आणि त्याच्या दोन माणसांनी मला गाठलं. मला लाठ्यांनी मारलं. तुला खूप आवाज दिला पण तू नव्हतास. खूप वेदना झाल्या रे आणि नंतर... हळू हळू वेदना कमी पण झाल्या, मला झोप आली, खूप झोप आली.. इतकी की मला जागच राहता येईना...*

*मी आता परत नाही येऊ शकत. आता तुला खंबीर होऊन सगळ्यांना सांभाळायचं आणि त्याने बळकावलेली माझी जमीन परत मिळवायचीय..*

*तुझा,*

*आबा*

सगळ्यांच्याच चेह-यावर विस्मयाचे भाव होते. जमदाडेंचा चेहरा मात्र धीरगंभीर. त्यांनी एक लांब सुस्कारा सोडला.

“म्हणजे हे पत्र वगैरे सगळं... आबांना आपल्याला हे सांगायचं होतं?” – नरेंद्र

जमदाडेंनी नरेंद्रच्या खांद्यावर हात ठेवला.

त्यानंतर कित्येक दिवस ह्याच विषयाची चर्चा रंगली. सरपंचही कुठे पळून गेला. लवकरच पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. कुठलाही साक्षीदार नव्हता, तरीही सरपंचाने गुन्हा मान्य केला. म्हणे आबा त्याला स्वप्नात दिसायला लागले होते. सगळ्या सांगोवांगी गोष्टी होत्या. कोर्टात त्याच्यावर खटला चालू होता.

दरम्यान माझी बदली पुन्हा राजापूरला झाली. बदलीसाठी वैद्यांनी विशेष प्रयत्न केले. माझीही ओढाताण संपली.

त्यानंतर खटल्याचा निकाल लागला. सरपंचाला गुन्हा मान्य असल्याने निकालात अडथळे नाही आले. त्याला आणि त्याच्या दोन माणसांना जन्मठेपेची शिक्षा झाली.

मला आठवतंय, निकाल लागल्याच्या दुस-याच दिवशी संध्याकाळी राजापूरच्या घराचा दरवाजा वाजला. उघडला तर.. समोर एक बाई.. तीच जी मला प्रभानावल्लीत सातपुतेंच्या घरी दिसलेली.

मी तिच्याकडे नुसता बघत बसलो. आश्चर्याचा भर ओसरला तसे माझ्या तोंडातून शब्द फुटले.. "ताई तू?"

ती नुसतीच हसली.

"आणि इतक्या उशीरा संध्याकाळी? आणि भावोजी कुठे आहेत?"

"आलेत ना. हे काय आलेच." घराच्या पाय-या चढून नरेंद्र आत आले.

"भावोजी, या." मी त्यांच्या हातातील पिशव्या घेतल्या.

माझ्या पत्नीने पाण्याचा तांब्या आणला.

"कसं चालू आहे बाकी? ब-याच महिन्यांनी येणं झालं ना."

"आबांच्या जाण्यानंतर आज, जवळ जवळ दिड-एक वर्षांनी गावाच्या बाहेर पडलोय."

"हो. बरं तुम्ही हातपाय धुऊन घ्या, तोवर ही चहा टाकेल."

चहापाणी झालं. ताई हिच्यासोबत आत आईकडे होती. मी आणि भावोजी खळ्यांत (अंगणात) बसलो.

बराच वेळ शांततेत गेला. मग मीच सुरुवात केली.

“माफ करा, पण आबांच्या वेळी तुम्हाला भेटायला यायला जमलं नाही मला आईच्या आजारपणामुळे. कोणाला तरी इथे थांबायचंच होतं, मग मी थांबलो इथेच आणि बंडूला पाठवला.”

“अरे माफी कसली मागतोयस? उलट त्यामुळेच हे रामायण घडू शकलं. तू जे केलंस, ते मला जन्मात शक्य झालं नसतं.” भावोजींच्या चेह-यावरसमाधान होतं.

“पण त्यामुळेच मला दिवसकार्याला पण येता नाही आलं.” माझी खंत मी बोलून दाखवली.

“मला इतके दिवस गुदमरल्यासारखं झालं होतं, तुला भेटता पण नाही आलं. आज तुझ्यामुळे तो खुनी सरपंच तुरुंगात आहे आणि माझी काहीच मदत नव्हती तुला.” भावोजी कृतज्ञेच्या सुरात म्हणाले.

“त्या दिवशी एकीकडे हातात बदलीची ऑर्डर आली आणि दुसरीकडे आबांचं हे अस झालं हे कळलं. दोन दिवसांनी बंडू ज्यावेळी प्रभानवल्लीहून परतला, त्यावेळी तुम्ही त्याला सांगितलेली सगळी हकिकत मला कळली.”

“खूप त्रास झाला रे. कर्ज फेडून सुद्धा आबांना जमिनीचे कागद देत नव्हता सरपंच. रस्त्यालगतची जागा, ती कशाला सोडतोय तो. आबांनी, मी खूप जोर दिला. पण तो कुठला दाद देतोय गरिबाला. त्या दिवशी नदीकाठी तडफडत होते रे, माझ्या समोर. डोकं खूप तापलं होतं माझं, पण मी दुबळा काय लढणार होतो सरपंचाशी? मी प्रत्यक्ष तर खून नव्हता ना पहिला. शेवटच्या क्षणांत आबांनी सांगितलेल्यावर काय न्याय देणार होतो मी त्यांना? खूप वाकडं पाऊल उचललं असतं, पण आई, तुझी ताई, दोन लेकरं ह्याचं पुढे काय, हि चिंता होतीच.. मी हतबल झालो रे.” भावोजींचे डोळे पाणावले.

“खरं आहे तुमचं भावोजी. त्यावेळी जे काही सुचलं ते तुम्हाला बंडूमार्फत लगेच कळवलं. वाटलं, इतका राकट, पैशाच्या ताकतीने माजलेला माणूस, अदृश्य शक्तीला नक्की घाबरेल, शरण येईल.”

“आणि तो आला.” भावोजी समाधानाने म्हणाले.

“बरं जमिनीचे कागद, गहाणखत मिळालं ना?”

“हो. पण मला एक नाही कळालं, शेवटचं जे पत्र तू दिलंस, त्यात तू कर्जाची रक्कम लिहिली होतीस. ती तर मलाही माहीत नव्हती. आबा म्हणायचे तू कशाला चिंता करतोस मी आहे ना तायडीचं लग्न करून देण्यासाठी, लेकीच्या लग्नाचं कर्ज मीच फेडणार. पुढे जेव्हा सरपंचाला पकडला आणि पोलिसांनी मला गहाणखत दिलं तेव्हा मला कर्जाची रक्कम समजली. पण मग तुला कशी समजली?”

मी काही क्षण निरुत्तर होतो.

“पहिली दोन पत्रं मी लिहिली, डाव्या हाताने. पण तिसरं पत्र मी नव्हतं लिहिलं.”

“म्हणजे?”

“काय लिहावं हे मला सुचत नव्हतं. मला अचानक प्रभानवल्लीला यावं लागलं, शाळेचं पत्र होतं म्हणून. आणि… आणि त्यावेळी ‘ते’ पत्र माझ्या दप्तरात होतं. ते कसं आणि कुठून आलं, हे मला आजपर्यंत समजलं नाहीये.”

त्यानंतर बराच वेळ आम्ही दोघेही शांत बसून होतो. तिन्हीसांज रात्रीकडे कधीच झुकली होती, रातकिड्यांची किरकिर सुरू झालेली, बाकी सगळीकडे निरव शांतता होती.

***